बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २४ | बुधवार,दि. २४ मे २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची कामाकरीता पायपीट अन् राजकारणी बनले ठेकेदार

गोंदिया: शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील राजकीत नेते, पदाधिकारी व कार्यकर्तेच ठेकेदार बनले असून विशेष म्हणजे ठेकेदारी करणाऱ्या अनेकांजवळ परवाना नाही. मात्र, तरीही दुसऱ्यांच्या नावावर कामे घेऊन ती कामे केली जात असल्याचे चित्र आहेत. ठेकेदारीचा कोणताही अनुभव नसताना आणि जास्त पैशाच्या हव्यासापोटी काही कार्यकर्त्यांनी राजकारणात निवडून येऊन राजकीय पद हस्तांतरीत करुन ठेकेदारीचा धंदा सुरु केला असून प्रशासनाने दखल घेऊन अवैधरित्या ठेकेदारी करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

तर दुसरीकडे गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे ६२४ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याची नोंदणी आहे.यापैकी आजही ५० टक्केहून अधिक सुबेअना काम वाटप समितीच्यावतीने कामच दिले गेले नसल्याचे सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या कामवाटपाच्या यादीवरुन बघावयास मिळत आहे.

विशेष म्हणजे एका आर्थिक वर्षात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला काम देतांना एका आर्थिक वर्षात ६० लाख रुपयाच्यावर काम देता येत नसल्याचे बांधकाम विभागाचे धोरण आहे.पहिल्यावेळी ५ लाखाचे काम त्यानंतर १५ लाखाचे काम आणि त्या आर्थिक वर्षात ६० लाखाचे काम असे असतांना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे नोंदणी असलेल्या सुमारे २२ ते २५ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याना १ कोटीच्यावर रक्कमेची कामे वाटप करण्यात आल्याची माहिती उघड झाली आहे.या २५ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याने लागोपाठ २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षात कोट्यावधीची कामे केली तर काही सुबेअना १ ते ३ लाख रुपयाच्या कामावरच समाधान मानावे लागले आहे.

विशेष म्हणजे शासनाने राज्यस्तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन २००० पासून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची नोंदणी केली तर गोंदिया जिल्हा परिषदेत २००५ पासून ही नोंदणी सुरु करण्यात आली आहे.शासकीय धोरणानुसार नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला नोंदणीच्या १० वर्षानंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याच्या यादीतून हटवायचे आहे.जेणेकरुन इतरांनाही काम करण्याची संधी मिळेल.सोबतच नोंदणी केलेल्या प्रत्येकाला काम मिळेल असे नियोजन बांधकाम विभागाच्या निविदा शाखेला घ्यालवयाचे आहेत.

त्यातच सु.बे.अ.यांना कामासाठी जेव्हा ते इच्छापत्र

नोंदणीसाठी अशी लागतात कागदपत्रे

नियमित ठेकेदार म्हणून परवाना मिळविण्यासाठी इच्छुक ठेकेदारांना वय, रहिवासी दाखला, खासगी कामे केल्याच्या अनुभवाचे प्रमणपत्र, जेवढ्या रकमेची कामे करायची त्या दुप्पट रकमेची कामे केल्याचे अर्किटेक्ट प्रमाणित प्रमाणपत्र आदि कागदपत्रे लागतात. या कागदपत्रांची पूर्तता होत असल्यासच परवाना दिला जातो. असे प्रशासनाकडून सांगण्यात येते.

सादर करतील त्यावेळी त्यांना देण्यात आलेल्या कामाचे पासबूक पुस्तक सादर करणे आवश्यक आहे.जर पासबूक सादर केले नाही तर त्यांने काम नाकारले असे गृहीत धरण्यात येईल व त्याचे नाव विचारात घेतले जाणार नसल्याचे धोरण असतांना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे अशा नोंदीच्या पासबुकच आजपर्यंत अपडेट करण्यात न आल्याने मोजक्याच काही सुबेअंना वारंवार कामे मिळत असल्याचे दिसून येत आहे.त्यातच ज्यांच्या नोंदणीला दहा वर्ष पुर्ण झाले,त्यांची नावे सुध्दा वगळण्याची प्रकिया बांधकाम विभागाने केलेली दिसून येत आहे.या सर्व काम वाटपामध्ये मोठ्याप्रमाणात सावळागोंधळ गेल्या ५-१० वर्षापासून या विभागात सुरु असल्याने अनेक सुबेअंना कामाची निविदा मिळण्यापासून काही निवडक सुबेअमुळे वंचित राहण्याची वेळ आली आहे.

कामांची चौकशी केल्यास निकृष्ठ कामासोबतच त्यातील भ्रष्टाचार समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, कामाची चौकशी करणार तरी कोण, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामीण भागासह शहरातील अनेक नवीन रस्त्यांना दोन चार महिन्यांतच भेगा पडताना दिसत आहेत. तर अनेक रस्त्यांवर मुरुम वरती आल्याचे दिसत आहे. बऱ्याच ठिकाणांची कामे अंदाजपत्रक डावलून करण्यात येत आहे.**(पुढील अंकात त्या निवडक सुबेअंची नावे करणार जाहीर)**

काय आहे शासन निर्णय

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. ११ जानेवारी २००० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रु.५ लक्ष किमतीपर्यंतची कामे मजूर सहकारी संस्थांना निविदा न मागविता कृषी व सहकार विभागाने विहित केलेल्या पद्धतीनुसार देण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. २९ जुलै, २००२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ज्या स्थापत्य सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांनी रू.५ लक्ष पर्यंतचे एक किंवा तेवढ्या किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत, त्यांना तद्रंतर रु.२० लक्षपर्यंतच्या किंमतीची दोन किंवा अधिक अशी एकूण रू.२५ लक्ष किंमतीची कामे विनास्पर्धा देण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२५ मार्च, २००३ रोजीच्या परिपत्रकानुसार रू.१० लक्षपेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा प्रणाली बंधनकारक करण्यात आली होती. तद्रंतर सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-२०२/प्र.क्र.२७३/३९ दि.२६/११/२०१४ अन्वये रू.३ लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी ई-निविदा पद्धतीचा अवलंब करण्याच्या सुचना दिल्या. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२४/४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मजूर सहकारी संस्थांसाठी काम वाटपासाठी निश्चित करण्यात आलेल्या ३३ टक्के राखीव कामामधील मजूर सहकारी संस्थांसाठी राखीव ठेवावयाची रु.३ लक्ष पेक्षा जास्त किंमतीची कामे ई-निविदा पद्धतीने मजूर सहकारी संस्थांच्या संवर्गातील सदस्यांकडून निविदा प्राप्त करुन घेऊन कामे आहेत.

नक्षली कारवायांना प्रत्युत्तर देण्यासाठी "केकेएम" ट्रायजंक्शन

गोंदिया:- महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेशच्या सीमेलगत असलेल्या भागात नक्षल्यांचा वावर मोठ्याप्रमाणात असल्याने आणि गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी नक्षलग्रस्त असलेल्या भागाला रेस्टझोन निवडल्याने भविष्यातील हालचालीवंर नजर ठेवत नक्षल्यांचे समुळ उच्चाटनाच्या उद्देशाने केकेएम ट्रायजेंक्शन अंतर्गत मुरकुटडोह येथे सशस्त्र पोलीस दुरक्षेत्र उभारण्यात आले आहे.

गडचिरोली पोलिसांनी जेव्हा अबुझामगड येथील नक्षल्यांचे बेसकॅम्प उध्वस्त केले, त्यानंतर नक्षल्यांनी मुरकुटडोह, कट्टेपार व कटेंमा या भागात आपला बेसकॅम्प बसविण्याची योजना आखली होती. त्यामुळे पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्या आधीच याठिकाणी महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेशातील पोलीस प्रशासनाने एकत्र येत सयुंक्त कारवाईच्या दृष्टीने हे मुरकुटडोह येथे सयुंक्त सशस्त्र पोलीस चौकी उभारली आहे. गोंदिया जिल्ह्याच्या टोकावर असलेल्या मुरकुटडोह या अत्यंत नक्षलग्रस्त भागात २० मे रोजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले.

जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील मुरकुटडोह क्र. १, २, ३ आणि दंडारी हे नक्षलवादी कारवायांमुळे अति संवेदनशील क्षेत्र आहेत. ही सर्व गावे दरेरकसा ग्रामपंचायत अंतर्गत येतात. यापैकी छत्तीसगड राज्याची सीमा मुरकुटडोहपासून अवघ्या ४-५ किमी अंतरावर आहे. यापैकी, छत्तीसगड राज्यातील पुर्वीच्या राजनांदगाव व आत्ताच्या खैरागड जिल्ह्यातील कट्टेमा गाव मुरकुटडोहसह १ किमीची सीमा सामायिक करते, तर मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील कट्टेपार (सितेपाला पोलीसचौकी अंतर्गत) गाव केवळ ३.५ किमी अंतरावर जिल्ह्याच्या सीमेला लागून आहे.

यागावाजवळून वाहणाऱ्या नाल्याच्या इकडे महाराष्ट्र तर पलीकडे मध्यप्रदेश व छत्तीसगड असा परिसर पहाडाने व्यापलेला आहे. हा डोंगराळ व जंगल परिसर नक्षलवाद्यांच्या कारवायांचा परिसर आहे. या भागात यापूर्वीही अनेक नक्षलवादी घटना समोर आल्या आहेत. सध्या नक्षलवादी घटनांमध्ये घट झाली आहे. मात्र या नक्षलवादी घटना आणि कारवाया रोखण्यासाठी मुरकुटडोह येथे बेस कॅम्प उभारणे गरजेचे होते. त्यासाठी तत्कालीन पोलीस महासंचालक सुबोध जायस्वाल यांनी पुढाकार घेत मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या पोलीस महासंचालकांशी सवांद साधत सयुंक्त कारवाईकरीता एकत्र तीन्ही ठिकाणचे पोलीस सोबत असणे आवश्यक असल्याचे पटवून दिले होते. त्यानंतर याठिकाणी या सशस्त्र पोलीस चौकीच्या बांधकामाला सुरवात झाली.

संयुक्त कारवाई आणि नक्षल्यांवर वचक ठेवण्यासाठी हे ट्रायजंक्शन-पोलीस अधिक्षक निखील पिंगळे

गोंदिया जिल्ह्यात सध्याच्या घडीला नक्षल कारवाया नसल्या तरी अधूनमधून नक्षली आपले वर्चस्व याठिकाणी गाजविण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येतात. त्यातच गोंदिया जिल्ह्याची सीमा ही छत्तीसगडच्या राजनांदगाव, खैरागढ व मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्याला लागून आहे. बालाघाट व मंडला जिल्ह्यातील कान्हा राष्ट्रीय व्याघ्रप्रकल्पातील घनदाटजंगल आणि सिमावर्ती भागातील जंगलाचा फायदा घेत नक्षल्यानी या मार्गाने कान्हा ते अमरकंटक पर्यत आपली मुव्हमेंट कायम ठेवली आहे. यातच मुरकुटडोह हा भाग मध्यभागी येत असल्याने याठिकाणी आपले स्थान निश्चित करणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने याठिकाणी १.५७ हेक्टर जागेवर या आमर्ड आऊटपोस्टचे बांधकाम २०१९ पासून सुरु करण्यात आले आणि २०२२ मध्ये पुर्ण करण्यात आले. या आऊट पोस्टच्या माध्यमातून नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी तिन्ही राज्यांचे पोलीस संयुक्त मोहिमेअंतर्गत कार्यरत आहेत. छत्तीसगड राज्यातील कट्टेमा, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील कट्टेपार आणि मुरकुटडोह या अतिसंवेदनशील क्षेत्रासह KKM टीम अंतर्गत काम केले जात असल्याची माहिती पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांनी दिली.



केकेएम ट्रायजंक्शनमुळे कारवायांवर आळा -पोलीस उपमहानिरिक्षक संदिप पाटील

केकेएम (कट्टेपार, कट्टेमा व मुरकुटडोह) ट्रायजंक्शनमुळे नक्षल गतीविधीवर नजर ठेवण्यास मदत होत असून एखाद्या घटनेच्यावेळी कारवाई करतांना वरील आदेशाची वाट बघण्याचा किंवा त्या राज्यातील सिमेत कसा प्रवेश करायचा हा प्रश्न निकाली निघाला आहे. केकेएममध्ये महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेश पोलिसांच्या तीन तुकड्या सोबत काम करीत असतात. छत्तीसगडच्या भागात कारवाई झाल्यास त्याभागात महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या पोलिसांना कारवाईसाठी जातांना विचार करावा लागायचा, मात्र आत्ता छत्तीसगडचेही जवान सोबतच राहत असल्याने त्याठिकाणी त्यांच्या नेतृत्वात तर मध्यप्रदेशातील भागात मध्यप्रदेश पोलिसांच्या नेतृत्वात एकत्र कारवाई करण्यास मदत झाल्याने भविष्यात या केकेएम ट्रायजंक्शनमुळे नक्षल्यांच्या वावर याभागातून कमी झाल्याचे दिसेल असे सांगितले.

कट्टेमा येथे ही एओपीचे काम सुरू

छत्तीसगड राज्यातील कट्टेमा याठिकाणी सुध्दा छत्तीसगड प्रशासनाने पोलीस आऊटपोस्टचे काम हाती घेतले आहे.त्यामुळे भविष्यात नक्षल कारवायांवंर अधिक लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे.

२००० च्या नोटा बदलण्याच्या प्रक्रियेला आजपासून प्रारंभ, आयडीची नसेल गरज

दिल्ली: देशातील सर्व बँकांमध्ये २००० च्या नोटा बदलण्याच्या प्रक्रियेला आजपासून म्हणजेच मंगळवारपासून (२३ मे) सुरू होत आहे. ३ दिवसांपूर्वी १९ मे रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) २००० ची नोट चलनातून काढून घेण्याची घोषणा केली होती. ग्राहक ३० सप्टेंबरपर्यंत बँकांमध्ये २००० च्या नोटा बदलून किंवा त्यांच्या खात्यात जमा करू शकतात.

आरबीआयच्या मुदतीनंतरही २००० ची नोट कायदेशीर राहील. म्हणजेच सध्याच्या नोटा अवैध ठरणार नाहीत. लोकांना या नोटा लवकरच बँकांमध्ये परत करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही अंतिम मुदत आहे.

नोटा बदलण्यासाठी ओळखपत्राची गरज नाही

आरबीआय आणि एसबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नोटा बदलण्यासाठी कोणत्याही आयडीची आवश्यकता नाही आणि कोणताही फॉर्म भरावा लागणार नाही. एका वेळी २०,००० रुपयांच्या फक्त १० नोटा बदलल्या जातील, परंतु या नोटा खात्यात जमा करण्यावर कोणतीही मर्यादा नाही. बँका २००० च्या नोटा जारी करणार नाहीत.

नोव्हेंबर २०१६ मध्ये २ हजाराची नोट बाजारात आली होती. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटा बंद केल्या होत्या. त्याऐवजी नव्या पॅटर्नमध्ये ५०० आणि २००० च्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या. RBI ने २०१८-१९ पासून २००० च्या नोटांची छपाई बंद केली आहे.

आयडीविना नोट बदलण्यास विरोध, कोर्टात जनहित याचिका

कागदपत्रांशिवाय नोटा बदलून देण्याच्या रिझर्व्ह बँक आणि स्टेट बँकेच्या आदेशाविरोधात भाजप नेते आणि वकील अश्वनी उपाध्याय यांनी दिल्ली उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्यांनी कोणत्याही ओळखीच्या पुराव्याशिवाय २००० च्या नोटा बदलून देऊ नयेत अशी मागणी केली आहे.

चलन व्यवस्थापनाअंतर्गत घेण्यात आला निर्णय : आरबीआय गव्हर्नर

आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी एक दिवसापूर्वी नोटा बदलण्यासाठी लोकांनी बँकांमध्ये गर्दी करू नये, असे म्हटले होते. आम्ही ४ महिन्यांची मुदत दिली आहे. नोट्स बदलण्यास मोकळ्या मनाने, परंतु वेळेची मर्यादा गांभीर्याने घ्या. चलन व्यवस्थापनांतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. २००० ची नोट चलनातून काढून टाकण्याच्या निर्णयाचा अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम होणार नाही. चलनात असलेल्या एकूण चलनापैकी फक्त १०.८% चलन २००० च्या नोटांमध्ये आहे.

31 मार्च पर्यंत 2 हजाराच्या 181 कोटीच्या नोटा होत्या बाजारात

दिनांक	नोटांची किंमत	किती होत्या नोटा
31 मार्च 2018	6.73 लाख कोटी	336.5 कोटी
31 मार्च 2023	3.62 लाख कोटी	181 कोटी

युपीएससीमध्ये उपराजधानीतील विद्यार्थ्यांचा झेंडा

नागपूर : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यात महाराष्ट्रसह उपराजधानीच्या निकालाचा टक्का वाढला आहे. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूरमधून सात उमेदवारांनी मुलाखती दिल्या होत्या. यातील चार उमेदवारांनी या परीक्षेत बाजी मारली आहे. यात अमित इंदूवाडे, राजश्री देशमुख, राहुल आत्राम आणि प्रतीक कोरडे यांचा समावेश आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने २४ एप्रिल ते १८ मे २०२३ या कालावधीत ५८२ उमेदवारांची तिसऱ्या टप्प्यातील वैयक्तिक मुलाखत घेतली होती.यात नागपूरच्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातील चार विद्यार्थी पात्र ठरले होते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल केंद्राचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी समाधान व्यक्त केले. तसेच प्रशिक्षण केंद्रामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत होत असल्याचेही ते म्हणाले.

संविधानविरोधी नक्षल्यांच्या विषारी विचारांना जमिनीत गाडून टाकूया : ना.सुधीर मुनगंटीवार

सशस्त्र दुरक्षेत्र बेसकॅम्प मुरकुटडोहचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

गोंदिया:- बंदुकी, तलवारीच्या जोरावर आतंकवाद पसरविणे हे सविधानाला मान्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात आतंकवादी व नक्षलवादी घटनांवर आळा बसला आहे. जगात आमच्या देशातले सैन्य व राज्यातील पोलिस सर्वात शौर्यवान व निडर आहेत. मी त्यांचे कौतुक करतो. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या या सिमाभागातील संगमावर केंद्र व राज्य सरकारच्या योजनेतून हे बेसकॅम्प तयार करण्यात आले आहे. या संगमावरुन नक्षलवाद्यांना कंठस्नान मिळेल व ते यमसदणी जातील. अश्या सविंधानविरोधी नक्षल्यांच्या विषारी विचारांना गाडून टाकूया असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री व पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ते आज २० मे रोजी सालेकसा तालुक्यातील मुरकुटडोह क्रं.३ येथे सशस्त्र दुरक्षेत्र बेसकॅम्पच्या सुसज्ज इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

यावेळी खा.अशोक नेते, गडचिरोली गोंदिया नक्षल पोलिस उपमहानिरिक्षक संदिप पाटील, पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे, सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनमोल सागर, सरपंच जमनाबाई मरकाम , शंकर मडावी आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना मुनगंटीवार म्हणाले की, शेतकरी, विधवा, निराधार, दिव्यांग, आजारी व जनसामान्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या बऱ्याच कल्याणकारी योजना आहेत. मात्र, त्या त्यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्या योजना पोहोचविण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे ते म्हणाले.

या प्रसंगी खा.अशोक नेते यांनी सांगितले की, या क्षेत्राचा लोकप्रतिनिधी या नात्याने येथील नागरिकांच्या विकासासाठी प्रत्येक योजनांचा लाभ मिळवून देण्याकरीता आपण प्रयत्नशिल असल्याचे ते बोलले.

आपल्या प्रास्ताविकातून उपसंचालक संदिप पाटील म्हणाले की, २०१९ पासून सुरू असलेल्या या सशस्त्र दुरक्षेत्रच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामामुळे शासनाची योजना यशस्वी होत आहे. या परिसरातील नक्षल गतीविधी संपलेली आहे. पोलिस हे आपले बंधू आहेत. आपन सर्वांनी शिक्षणाचा महत्व समजून घ्यावा व आपल्या पाल्यांना शिक्षित करावे व शिक्षित व्हावे, तेव्हांच आपण प्रत्येक योजनेचा लाभ घेवू शकतो.

इमारतीचे लोकार्पण प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत पालकमंत्री मुनगंटीवार यांनी फित कापून केले व इमारतीची पाहणी केली. तद्रंतर दादालोरा योजनेतून विद्यार्थ्यांना सायकलीचे वितरण तसेच गावकऱ्यांना धान्य व बियाण्यांचे वाटप पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात महसूल विभागातर्फे गावात लावलेल्या शिबिरातून तयार करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी मानले.

कार्यक्रमाचे संचालन अपर पोलिस अधिक्षक अशोक बनकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक व गावकरी उपस्थित होते. यावेळी आरोग्य तपासणी शिबिर व कृषी मागदर्शन गाकतऱ्यांसाठी ठेवण्यात आले होते.

हे बेसकॅम्प तीन राज्याच्या संयुक्त कारवाईचे केंद्र

२०१९ मध्ये मंजुर झालेल्या मुरकुटडोह क्रं.३ येथे तयार झालेल्या या इमारतीचे लोकार्पण झाले. मात्र मंजुरी मिळताच बांधकामाला प्रारंभ झाला होता. १.५७ हेक्टर जागेवर हे बेसकॅम्प तयार करण्यात आलेले आहे. हे गाव व परिसर नक्षलग्रस्त असून मुरकुटडोह १, २, ३, दंडारी, टेकाटोला, दलदलकुही आदी गावे आहेत. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या सिमेवर असलेल्या या बेसकॅम्पवर तिन्ही राज्याच्या पोलिसांमार्फत संयुक्त कारवाई करता येईल.

३० ते ३२ हजार पदे ऑगस्ट २०२३ पूर्वी भरली जाणार

नागपूर: राज्यात सत्तेवर आल्यानंतर दुसऱ्याच महिन्यात (ऑगस्ट २०२२) शिंदे-फडणवीस सरकारने मेगाभरतीची घोषणा केली होती. कालबद्ध पद्धतीने १५ ऑगस्ट २०२३ पूर्वी भरती पूर्ण करण्याचेही जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर २०२२-२३ ची संचमान्यता अंतिम झाल्यावर जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकांसह खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांची ३० ते ३२ हजार पदे ऑगस्ट २०२३ पूर्वी भरली जातील. पुढच्या वर्षी उर्वरित ५० टक्के पदभरती होईल, असे शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. २० ऑक्टोबर २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब, क आणि गट-ड पदभरतीसाठी टीसीएस, आयबीपीएस या कंपन्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय झाला. सध्या महसूल, कृषी, शालेय शिक्षण, ग्रामविकास, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य व गृह, जलसंपदा (पाटबंधारे), महिला व बालकल्याण, सामाजिक न्याय, पशुसंवर्धन अशा महत्वपूर्ण विभागांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही रिक्त पदे वाढली आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांसह लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका, राजकीय सद्य:स्थिती, राज्यात वाढलेली बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर सरकारला मेगाभरती करावीच लागणार आहे. त्यादृष्टीने भरतीचा कृती आराखडा युद्धपातळीवर तयार करण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले.

ऑगस्टपूर्वीच ३० ते ३२ हजार शिक्षकांची भरती राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची तब्बल ६७ हजार पदे रिक्त आहेत. रिक्तपदांमुळे गुणवत्तेवर परिणाम झाला असून पटसंख्याही कमी होत आहे. जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकांसह खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांची ३० ते ३२ हजार पदे ऑगस्ट २०२३ पूर्वी भरल्या जाणार आहेत.

कोराडीतील प्रस्तावित वीज प्रकल्पाला गडकरी पाठोपाठ काँग्रेस आमदार विकास ठाकरेंचाही विरोध

नागपूर: केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी महानिर्मितीच्या कोराडीतील प्रस्तावित १ हजार ३२० मेगावॅटच्या प्रकल्पाला विरोध केला होता. त्यापाठोपाठ आता काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे यांनीही प्रकल्पाला विरोध करत २९ मे रोजीची जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली आहे.नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना विकास ठाकरे यांनी निवेदन दिले. कोराडीच्या प्रकल्पात सध्या ६६० मेगावॅटचे ३ संच कार्यान्वित आहे. हे लावतांना महानिमितीने प्रदुषण कमी करण्यासाठी फ्लू गॅस डिसल्फ्युरायझेशन (एफजीडी) लावले नाही. त्यामुळे नागरिकांना प्रदुषणाच्या त्रासाला तोंड द्यावे लागते. कोराडीतील पूर्वीच्या वीज निर्मिती संचावर एफजीडी लावल्याशिवाय नवीन संच लावू नये. असे ठाकरे यांनी पत्रात नमुद केले आहे.दरम्यान २९ मे रोजी भर उन्हात १२.३० वाजता जनसुनावणी आयोजित केली आहे. सध्या शहराचे तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या जवळपास आहे. नागरिकांना उष्णाघाताचाही धोका बघता या जनसुनावणी रद्द करावी, अशी मागणीही ठाकरे यांनी केली.

संपादकीय

जलसंकटामुळे देश संघर्षाच्या उंबरठ्यावर

संयुक्त राष्ट्राचे माजी सरचिटणीस कोफी अन्नान यांनी पृथ्वीवरील पाण्याचे संकट गहिरे होत राहिल्यास पाणी मिळविण्यासाठी वेगवेगळे देश एकमेकांशी युद्ध करतील, अशी भीती व्यक्त केली आहे. भारतात गेल्या काही दशकांपासून विविध राज्यांमध्ये पाणीवाटपावरुन तीव्र मतभेद आहेत. सध्याही काही राज्यांमध्ये पाणीवाटपाचा प्रश्न सतत प्रलंबित राहिल्याने पाणीसंकटाची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.

पाण्याच्या प्रश्नावर "ग्लोबल कमिशन ऑन द इकॉनॉमिक्स ऑफ वॉटर' (जीसीईडब्ल्यू) ने प्रसिद्ध केलेल्या अहवालात एक धक्कादायक वास्तव जगासमोर ठेवण्यात आले आहे. या दशकाच्या अखेरीस पाण्याच्या मागणीत वाढ होईल. ही मागणी चाळीस टक्क्यांनी वाढेल. त्याच वेळी पाण्याची टंचाई आणखी वाढेल. सतत वाढणाऱ्या उष्णतेमुळे पुढील दोन दशकांमध्ये अन्न उत्पादनात लक्षणीय घट होईल. या अहवालानुसार, भारताला अन्न पुरवठ्यातही सोळा टक्क्यांहून अधिक तुटवडा जाणवेल. अन्न असुरक्षित लोकसंख्या पन्नास टक्क्यांहून अधिक वाढेल. अहवालानुसार, भारतातील पाणीपुरवठ्याची उपलब्धता १,१०० ते १,१९७ अब्ज घनमीटर दरम्यान आहे आणि २०१० च्या तुलनेत २०५० पर्यंत भारतातील पाण्याची मागणी दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. वास्तविकता अशी आहे की, जगातील जवळपास सर्वच देशांसोबत भारतासाठी आता पाण्याचे संकट गंभीर बनले आहे. जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे अठरा टक्के लोक भारतात राहतात, तर भारताकडे केवळ चार टक्के जलस्त्रोत उपलब्ध आहेत. देशातील सात राज्यांमधील ८,२२० ग्रामपंचायतींमध्ये भूजल व्यवस्थापनासाठी "अटल भूजल योजना' सुरू असली, तरी भूजलाची घसरलेली पातळी पाहता देशभरात ती गांभीर्याने राबवण्याची गरज आहे.

न्यूयॉर्कमध्ये जवळपास पाच दशकांनंतर गोड्या पाण्यावर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यात संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस गुटेरेस यांनी जगातील आणि भारतातील पाण्याच्या स्थितीचे भयावह चित्र मांडले होते. नद्या ही भारताची जीवनरेखा मानली गेली आहे; परंतु या परिषदेत गंगा, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा यांसारख्या प्रचंड नद्यांमधील पाणी कमी होत जाणार असून २०५० पर्यंत पाण्याची उपलब्धता गरजेच्या एक तृतीयांशपेक्षा कमी असेल, असे सांगण्यात आले. सुमारे २५०० किलोमीटर लांबीची गंगा ही भारतातील सर्वात महत्त्वाची नदी आहे. तिच्यावर अनेक राज्यातील करोडो लोक अवलंबून आहेत. हिमालयात ९,५७५ हिमनद्या आहेत. एकट्या उत्तराखंडमध्ये ९६८ हिमनद्या आहेत; मात्र हवामानातील असाधारण बदलामुळे हिमनद्या झपाट्याने वितळत आहेत. गेल्या ८७ वर्षांत ३० किलोमीटर लांबीच्या गंगोत्री हिमनदीपैकी १.७५ किलोमीटर वितळली आहे. हिमनद्या वेगाने वितळल्याने देशात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची अपेक्षा आहे. अलीकडेच, संयुक्त राष्ट्र संघाच्या ङ्गसीएसईफ अहवालाने इशारा दिला आहे की, कोट्यवधी लोकांना पाणी पुरवणाऱ्या गंगा, ब्रह्मपुत्रा आणि सिंधू आदी दहा नद्या कोरड्या पडण्याचा धोका आहे. एका अंदाजानुसार, सध्या जगात सुमारे दोन अब्ज लोक आहेत. त्यांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. यामुळे लाखो लोक आजारी पडतात आणि अकाली मृत्यूला बळी पडतात.

पृथ्वीचा सुमारे तीन चतुर्थांश भाग पाण्याने भरलेला असला तरी पृथ्वीवर असलेल्या पाण्याच्या अफाट स्त्रोतांपैकी केवळ दीड टक्केच पाणी पिण्यासाठी किंवा दैनंदिन कामांसाठी वापरणे शक्य आहे. पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी फक्त तीन टक्के पाणी स्वच्छ आहे. त्यापैकी सुमारे दोन टक्के पाणी बर्फाच्या रुपात पर्वतांवर आहे. उर्वरित एक टक्का पाणी पिण्यासाठी, सिंचन, शेती आणि उद्योगांसाठी वापरले जाते. उर्वरित पाणी खारट असल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे उपयुक्त किंवा जीवनदायी नाही. पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या या एक टक्का पाण्यापैकी सुमारे ९५ टक्के पाणी पृथ्वीच्या खालच्या थरात भूगर्भातील पाण्याच्या रुपात आणि उर्वरित पृथ्वीवरील तलाव, नद्यांमधून उपलब्ध आहे. आपल्या पाण्याच्या बहुतांश गरजा केवळ भूगर्भातील पाण्यापासूनच भागवल्या जातात; परंतु त्याचे प्रमाण लोकांच्या गरजा भागवण्यासाठी पुरेसे नाही. सध्या जगभरातील सुमारे तीन अब्ज लोकांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. विकसनशील देशांमध्ये ही समस्या गंभीर होत चालली आहे. तिथे सुमारे ९५ टक्के लोक या समस्येला तोंड देत आहेत. पुढील महायुद्धही पाण्यामुळेच होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात पाण्याच्या मुद्द्यावरुन मतभेद आहेत. उत्तर आफ्रिकेतील काही देशांमध्ये पाण्यावरुन संघर्ष झाला आहे. पाण्यावरुन इस्रायल आणि जॉर्डन, इजिप्त आणि इथिओपिया यांसारख्या इतर काही देशांमध्येही जोरदार संघर्ष सुरू झाला आहे.

भारतात गेल्या काही दशकांपासून विविध राज्यांमध्ये पाणी वाटपावरुन तीव्र मतभेद आहेत आणि सध्याही काही राज्यांमध्ये पाणीवाटपाचा प्रश्न सतत प्रलंबित राहिल्याने पाणीसंकटाची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. भारतात एके काळी हजारो नद्या वाहत असत; पण आज या हजारो नद्यांपैकी बहुतांश आता काही काळच प्रवाही असतात. त्या कोरड्या पडल्या आहेत. पूर्वी प्रत्येक गावात आणि परिसरात विहिरी आणि तलाव असायचे. ते आता नाहीसे झाले आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागावर वापरण्यायोग्य पाण्याचे प्रमाण खूपच कमी आहे आणि भूगर्भातील पाण्याची पातळीही सातत्याने कमी होत असेल, तर पाण्याची गरज कशी भागणार? पावसाच्या पाण्याची योग्य साठवणूक होत नसल्याने या पाण्याचा वापरही योग्य प्रकारे होऊ शकत नाही. पावसाच्या सुमारे १५ टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते आणि सुमारे ४० टक्के पाणी नद्यांमध्ये वाहून जाते, तर उर्वरित पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी किंचित वाढते आणि जमिनीतील आर्द्रता वाढते. या पार्श्वभूमीवर पावसाचा प्रत्येक थेंब अनमोल आहे. तो वाचवणे अत्यंत आवश्यक आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. पावसाच्या पाण्याच्या संवर्धनाकडे विशेष लक्ष दिल्यास नद्यांमध्ये विनाकारण वाहून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करुन पाण्याची कमतरता सहज भरुन काढता येईल आणि अशा प्रकारे जलसंकटाचा बऱ्याच अंशी मुकाबला करता येईल.

जलसंकट खरोखरच सोडवायचे असेल तर पाणी ही निसर्गाची अमूल्य देणगी आहे हे वेळीच समजून घेतले पाहिजे. नैसर्गिक संसाधने दूषित होण्यापासून संरक्षण करणे, पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे आणि पाण्याचा गैरवापर टाळणे अत्यंत आवश्यक आहे. "नेचर सस्टेनेबिलिटी' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनाचे निष्कर्ष दर्शवतात की, शहरांमधील वाढत्या जलसंकटाला पर्यावरणीय घटकांपेक्षा सामाजिक असमानता अधिक जबाबदार आहे. हा अभ्यास दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरावर आधारित असला तरी संशोधकांनी बंगळूरु, चेन्नई, जकार्ता, सिडनी, मापुटो, हरारे, साओ पाऊलो, लंडन, मियामी, बार्सिलोना, बीजिंग या शहरांचाही अभ्यास केला आहे. त्याचा निष्कर्ष असा आहे की, उच्च आणि उच्च-मध्यम उत्पन्न असलेली कुटुंबे दररोज सरासरी २,१६१ लिटर पाणी वापरतात, तर दुर्बल घटकातील कुटुंबे दररोज सरासरी १७८ लिटर पाणी वापरतात. हवामान बदल आणि लोकसंख्या वाढ याचा अर्थ मोठ्या शहरांमध्ये पाणी अधिक महाग स्त्रोत बनत आहे. गेल्या दोन दशकांमध्ये दुष्काळ आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे जगातील ८० हून अधिक मोठी शहरे जलसंकटाने त्रस्त आहेत. भविष्यात हे संकट आणखी वाढेल, असा अंदाज आहे. जगातील अनेक भागांमध्ये गरीब आणि श्रीमंतांमधील दरी वाढत आहे. सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय असमानता यांच्यातील जवळचे नाते दर्शवते. त्यामुळे शहरांमध्ये पाणीवाटपाचे योग्य मार्ग विकसित न केल्यास सर्वांनाच परिणाम भोगावे लागतील.

वाढत्या जलसंकटाचा सर्वाधिक फटका भारताला बसणार आहे. पाण्याचा अयोग्य वापर आणि हवामान संकट या दोन्ही गोष्टी या वाढत्या टंचाईला कारणीभूत आहेत. आज हवामान संकटदेखील एक मोठा धोका बनत आहे. तापमानवाढीसह पर्जन्यमानावर परिणाम होत आहे. त्यामुळे जलसंकटाची समस्या आणखी वाढत आहे. येत्या काही वर्षांमध्ये शहरांवरील पाण्याचे संकट अधिक गंभीर स्वरुप धारण करेल, असा अंदाज आहे. आज शहरांमध्ये राहणारे सुमारे शंभर कोटी लोक म्हणजे शहरी लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकांना पाणी संकटाचा सामना करावा लागत आहे. २०५० पर्यंत हा आकडा २३७.३ कोटींपर्यंत वाढण्याची भीती आहे. संशोधनानुसार याचा सर्वाधिक फटका भारतातील शहरी लोकसंख्येला बसणार आहे. संयुक्त राष्ट्रांनी प्रसिद्ध केलेल्या नवीन ङ्गवर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट रिपोर्टफनुसार २०५० पर्यंत शहरांमधील पाण्याची मागणी ८० टक्क्यांनी वाढेल. आपण आपल्या जलस्त्रोतांचे अतिशोषण करत आहोत. ही समस्या टाळण्यासाठी परस्पर सहकार्य आणि भागीदारी आवश्यक आहे. पाणी हा एक अमूल्य स्त्रोत आहे. त्याचा अपव्यय आपल्या पुढील संकटात भर घालणार आहे, हे लक्षात ठेवावे लागेल.

भास्कर खंडागळे

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

मुर्तीजापूर तालुका, गाडगेबाबा आणि सत्यशोधक

अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर हा जुना तालुका नंतर या तालुक्याचे विभाजन होऊन कारंजा व मुर्तीजापूर असे दोन तालुके तयार झालेत. आज मुर्तीजापूर हा अकोला जिल्ह्यातील तर कारंजा हा वाशीम जिल्ह्यातील तालुका आहे. मुर्तीजापूर तालुक्यात सत्यशोधक चळवळ १९१३ सालापुर्वीच पोहोचलेली दिसते. मुर्तीजापूर-हिरपूर-येंडली आता दर्यापूर अमरावती राज्य हा महामार्गाला जोडणारा रस्ता आहे. हिरपूर हे चार-पाच हजार (आज) गाव असून त्याकाळी ते १००० ते १२०० वस्तीचे होते. येथे बरेच दिवसापासून सत्यशोधक गावच्या भट ब्राम्हणांचा व समाज मंडळीचा विळाभोपळा असावयाचा. त्याचप्रमाणे तुळशी विवाह तो काय? परंतु त्याचं ही भट मंडळी दाखवत त्यामुळे हिरपूर येथील भटास कोर्टातून खरमरीत ताकीद देऊन त्यांना वठणीवर आणले. त्यासाठी श्री. सखाराम शिवराम पाटील यांनी स्वत: ३०० रुपये खर्च केले. त्यांनी त्याकाठी हा खर्च स्वत: एकट्याने केला. ते दृढभिमानी सत्यशोधक होते. (दीनमित्र, ता.१६ जुलै १९१३), आज रोजी सखाराम शिवराम पाटील यांचे कुणीही वंशज हिरपूर गावात राहत नाही. कुणालाही त्यांच्याविषयी माहिती आढळली नाही.

याच सखाराम पाटील यांच्यामुळे गाडगेबाबा यांच्यावर सत्यशोधक विचाराचा प्रभाव पडल्याचे कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी दीनमित्रच्या ३० मे १९५६ च्या अंकात श्री गाडगेबाबांची थोडी माहिती या लेखात सांगितली आहे. ते म्हणतात, सांद्रतच्या श्री गाडगेबाबास आरंभी डेबूजी म्हणत सण १९०० नंतरच्या काही वर्षांनी डेबूजीने विचित्र पोषाख करुन मातीचे ढोमण अर्थात गाडगे गळ्यात अडकवून गावोगाव फिरुन किर्तनाचा कार्यक्रम उभारला. गळ्यातल्या गाडळ्यावरुन डेबुजीचे नाव गाडगेबाबा हे पडले. अमरावती येथील त्यांच्या किर्तनाच्या पत्रिका (हातपत्रिका) छापल्या जात. एक ग्लास बत्ती ज्या गावी किर्तनाचा बेत अस त्या गावात दवंडी फिरवीत. ग्यासबत्ती लावीत. गाडगेबाबा कुणाच्या गोठ्यात अगर अशाच अडचणीच्या ठिकाणी भाकर खात, गाडग्याने पाणी पीत आणि अशाच जागी अराम घेत आणि रात्र झाली म्हणजे किर्तन करीत. किर्तनाचा व्यावहारीक गोष्टी, विनोदी ही सोप्या भाषेत होत असत. देवाच्या नावाखाली तसेच साधुपणाच्या सोंगाखाली किर्तनप्रसंगी पुष्कळ मंडळी जमे.

किर्तन आटोपता-आटोपता डेबुजी हे कोठे तरी लपून बसून गुप्त झाल्याचे सोंग करीत. यांचे विनोदी व साध्या भाषेतील किर्तन विचित्र पोषाख किर्तनस्थळी एकदम गुप्त होणे, असले प्रकार होत असल्याने पुष्कळ लोकांची मने डेबुजी उर्फ गाडगेबाबाकडे आकर्षली गेली. अकोला आणि अमरावती जिल्ह्याच्या जोडात पूर्णा नदीच्या काठी ऋणमोचन नावाचे क्षेत्र आहे. तेथे पौष महिन्यात शेवटच्या रविवारी मोठी यात्रा भरते. सन १९१४ सालच्या पौष महिन्यातील शेवटच्या रविवारी ऋणमोचन येथे मोठी यात्रा भरली. श्री गाडगेबाबाच्या जातभाई परीट लोकांचा मोठा जमाव जमला त्यांचा भंडारा झाला. दानदात्या काही उदार गृहस्थांनी ह्या भंडाऱ्यास दाळ पाण्याची पुष्कळ मदत दिली.

मुर्तीजापूर जवळील हिरपूर येथील कै. सखाराम पाटील यांच्या अंत:करणास सत्यशोधक समाजातत्वे पूर्ण बिंबली होती. श्री गाडगेबाबांचे कार्य आणि त्याच्या मागे लाभलेली अफाट जनता पाहून पाटीलसाहेबांच्या मनात घोळ लागले की, ह्या डेबुजी धोबयाच्या हृदयी सत्यशोधक बीजारोपण करावे म्हणून त्यांनी सत्यशोधक समाजाचे प्रचारक शास्त्री नारोबाजी महाधट यांना पाचारण केले.

स्वत: तंबु व इतर खाण्यपिण्याचे सामान वगैरे घेऊन महाधटांना ऋणमोचन येथे नेले. महाधटांच्या मागे मीही होतो. हे प्रचारक पुणे जिल्ह्यातील ओतूर गावचे रहिवासी यांना शास्त्री नारोबाबाजी असे म्हणते. हे आणि धर्माजी डुंबरे इसवी सन १९०० च्या सुमारास सत्यशोधक समाजाच्या प्रसार करण्यास वऱ्हाडातून प्रथम करजगाव येथे आले. ब्राम्हणांचे धार्मिक वर्चस्व व पुरोहित हक्क झुगारुन देण्याचा त्यांनी प्रतिभार नागपूरपर्यंत धुमधडाक्याने प्रचार करुन ब्राम्हणेत्तर वर्ग खडबडून जागा केला. ब्राम्हणी हक्काबद्दल काही गावी कोर्टकचेऱ्या झाल्या. ब्राम्हण धार्मिक हक्काबद्दल अपयशी ठरले.

सदर हिरपूरच्या पाटलासंमती महाधट हे ऋणमोचन येथे गेले. त्यांनी श्री डेबुजीची भेट घेतली. त्यांना सांगितले की,

सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

मी आळंदीच्या वारकरी असून किर्तन करीत असतो. माझ्या किर्तनात खाळ मुदृंगाची गरज नाही. किर्तनास आपण असावे. आणि किर्तन समाप्त होईपर्यंत आपण उठून जावू नये. मी उठून जाणार असे वचन डेबुजीने दिले, मग काय? शास्त्री महाधटांनी सत्यशोधक समाजाचे मत डेबुजी पुढे ओतून त्यांना भारून टाकले. तेव्हापासून डेबुजी उर्फ गाडगेबाबा पुष्कळ बाबीत सत्यशोधक मतवादी बनले आणि निस्वार्थ बुद्धीने समाज कार्य करु लागले. अशा प्रकारचा दीर्घ लेख सुरुवातीला कृष्णाजी कर्काजी चौधरी यांनी घटना घडली तेव्हा व नंतर जनता जनार्दन मासिकासाठी १९५६ च्या मे महिन्यात पाठविली होती. हा लेख जसाचा तसा देण्याच्या उद्देश की, गाडगेबाबा आणि सत्यशोधक समाज व त्यांच्यावरील प्रभाव हा अवलोकनार्थ यावा यासाठी होय.

दीनमित्र १३ जानेवारी १९१५ मध्ये बक्षीराम रामजी कारंजेकर मुर्तीजापूर रेल्वे फोरमन यांनी एक पत्र गाडगेबाबा विषयी लिहिले आहे ते म्हणतात ३१/१२/१९१४ ऋणमोचन येथील प्रसिद्ध साधू डेबुजी यांचे किर्तन स्टेशनावर झाले. त्यात त्यांनी सांगितले की, हिंसा न करता प्रपंच करा, सदा चरणाने राहा, महाजांना लिहीणे, वाचणे मुळीच येत नसून ते निरिच्छ आहेत. त्यांच्या किर्तनास २००० च्यावर श्रोता वर्ग होता. यांच्या जाहिराती छापण्यास रेल्वे पार्सलचे मोकदम यांनी स्वत: पैसे दिले होते.

हिरपूर जवळच पुढे ऋणमोचन जवळ असणाऱ्या शेशू बाजार येथे मारूतीराव देशमुख यांच्या जलसा १२/९/१९२७ ला झाला होता. त्यावेळी श्रीथुन शामराव सितारामजी कुलर यांचे भाषण झाले होते. यावेळी २००० लोक उपस्थित होते. (दाढी) हा कार्यक्रम मुर्तीजापूर येथे गणपती उत्सवानिमित्त झाला होता.

दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी मात्र एकेठिकाणी गाडगेबाबावर टीका सुद्धा केली. ७ एप्रिल १९५४ च्या अंकात लिहिलेल्या गाडगेबाबांची गोष्ट या अग्रलेखात त्यांनी फुकट रेल्वे प्रवास करीत असल्याबद्दलचे दीनमित्रकारांनी नाराजी व्यक्त केली होती. गाडगेबाबांना माननारे बरेच आहेत त्यांच्या या वागण्याचा समाजावर प्रभाव पडेल असे सुद्धा म्हटले होते. तरी गाडगेबाबांवर सत्यशोधक प्रभाव होता आणि सत्यशोधक त्यांच्या संपर्कात होते असे जाणवते.

याशिवाय ब्राम्हणेत्तर दलीत चळवळीत सुद्धा हा तालुका सहभागी होता असे दिसते. २२ व २३ एप्रिल १९२४ रोजी भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सिरसो येथे वऱ्हाड महार परिषद झाली होती. स्वागताध्यक्ष होते केशराव गोविंदराव देशमुख, केशवराव जाणुजी खंडारे, सेक्रेटरी मानाजी जंगलाजी गवई, संपत नाईक व विठ्ठल मकेसर (अकोला जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीचा इतिहास लेख २३/२४ जानेवारी १९९९, पारस डॉ. अशोक चोपडे).

अकोला जिल्हा व अमरावती जिल्हा यांचे संयुक्त ब्राम्हणेत्तर परिषदेचे अधिवेशन काटे पूर्णाच्या संगमाजवळ काटेपूर्णा या गावी दि.३० व ३१ डिसेंबर १९२५ रोजी केशव गणेश बागडे पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. बाबुराव जेधे प्रामुख्याने हजर होते. याचवेळी नायगावकराच्या हरिचा लजसा व राजंदेकर यांचा जलसा दाखविण्यात आला. काटेपूर्णा येथील ॲड. बोळे यात पुढे होते.

याच तालुक्यातील गणपतराव प्रसिद्ध गाव असलेले माना या ठिकाणी सत्यशोधक समाज होता. गंगाराम सोनाजी दहीकर हे या शाखेचे सचिव होते. पुण्याहून प्रसिद्ध झालेल्या सत्यशोधक बा.रा.कोठारी यांच्या जागरूक पत्रात १२, १९ व २६ जानेवारी १९९८ रोजी तीन लेख प्रसिद्ध झाले होते. या निबंधाची उन्नतीचा राजमार्ग अथवा सत्यशोधक समाजाची तत्वे ही ४५ पृष्ठांची पुस्तिका ज्ञानसागर प्रेस अमरावतीवरुन प्रसिद्ध झाली होती. आज रोजी त्यांच्याविषयी या गावात कोणतीही माहिती मिळत नाही. अशाप्रकारे थोड्या-फार प्रमाणात का होईना सत्यशोधक समाज या परिसरात कार्यरत असल्याचे दिसते.

महापुरुषांचे विचार घरोघरी पोहोचविण्याची गरज

घनश्याम पानतवणे यांचे प्रतिपादन, बुद्ध जयंती महोत्सव थाटात

गोंदिया: पूर्वीच्या काळात समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा पसरल्या होत्या. महापुरुषांनी आपल्या विचारातून समाजात पसरलेले अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट परंपरा दूर करून समाजाला जागृत करण्याचे तसेच समाज व्यवस्थेला बद्दलविण्यासाठी मोलाचे कार्य केले आहे. त्यामुळे महापुरुषांची जयंती साजरी करीत असताना त्यातून महापुरुषांचे सामर्थ्यशाली मौलिक विचार प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे. असे विचार पूर्व नगरपरिद बांधकाम सभापती व बौद्ध सामूहिक विवाह समितीचे अध्यक्ष घनश्याम पानतवणे यांनी व्यक्त केले.

ते रविवारी (ता.२१) संजय नगर(कव्वाली मैदान)येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्व.जयंती उत्सव समितीतफे आयोजित भ.बुद्ध जयंती महोत्सव कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊराव उके,जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अमित भालेराव,पूर्व समिती अध्यक्ष सतीश बनसोड, प्रदीप ठवरे, पूर्व नगरसेविका सुषमा मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते दीपेंद्र वासनिक, राजेश बघेल, राजेश खरोले, विशाखा कोटांगले, विना गनवीर, रवी कोटांगले, डॉ. राजेंद्र वैद्य, डॉ. सोनाली वैद्य, प्रकाश टेंभरे, शेखर मेश्राम, प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात द्विप प्रज्वलन करून बुद्ध वंदनेने करण्यात आले. जयंती उत्सवाने त्रेचाळीस वर्षाची अबाधित परंपरा कायम राखली असून यावषी उत्सव समितीतर्फे रक्तदान शिबिर, सामूहिक विवाह,गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप,गरजूंना मदत इत्यादी समाजपयोगी कार्य केले आहे.

यावेळी समाजकार्यात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते घनश्याम पानतवणे व देवेंद्र रामटेके यांचा समितीतर्फे सत्कार करण्यात आला. जयंती उत्सवाने आंबेडकरी जनतेला मान, प्रतिष्ठा व सामर्थ्य प्राप्त करून दिले आहे. त्यामुळे भविष्यात उत्सव समितीतर्फे मोफत ॲम्बुलन्स सेवा, गरिबांच्या मुलामुलींसाठी मोफत दर्जेदार उच्च शिक्षणाची सोय, मोफत शैक्षणिक साहित्य वाटप, रक्तदान व सामूहिक विवाह चळवळ उभी करून त्यातून समाजाला प्रगतीवर आणण्याचे मोलाचे कार्य करण्यात येणार अशी ग्वाही यावेळी समितीचे अध्यक्ष अमित भालेराव यांनी आपल्या प्रास्ताविकेतुन व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिल डोंगरे, आकाश टेंभुर्णीकर, रवि भालाधरे, प्रवीण बोरकर, अमर राऊत, सुनील मेश्राम, वसंत गणवीर, वेदांत गजभिये, मिलिंद गणवीर, प्रफुल भालेराव, शैलेश टेम्भेकर, जितेंद्र सतिसेवाक तसेच नवयुवक बौद्ध समिती संजय नगर येथील युवकांनी सहकार्य केले. संचालन शयाम चौरे यांनी तर आभार हर्षपाल रंगारी यांनी मानले.

स्त्री शक्ती समाधान शिबिराचे जिल्हाभर आयोजन २४ ते ३० मे दरम्यान आयोजन

गोंदिया, : शासन आपल्या दारी या अभियानांतर्गत शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या महिलांविषयक व विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने तसेच महिलांच्या स्थानिक विविध शासकीय विभागांशी संबंधीत समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन २४ मे २०२३ पासून प्रत्येक तालुक्यात करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात गोंदिया येथून करण्यात येणार आहे. पहिले शिबीर पंचायत समिती, गोंदियाचे सभागृहात २४ मे रोजी सकाळी ०९ आयोजित करण्यात आले आहे.

२५ मे आयटीआय सभागृह आमगाव, २६ मे पंचायत समिती सभागृह तिरोडा, २६ मे तेजस्विनी लॉन शेंडा रोड सडक अर्जुनी, २९ मे गुरुकृपा लॉन ठाणा रोड गोरेगाव, २९ मे तहसील कार्यालय सभागृह देवरी, ३० मे शिवप्रसाद सदानंद वरिष्ठ महाविद्यालयाचे नवीन सभागृह अर्जुनी मोरगाव, ३० मे तहसील कार्यालय सभागृह सालेकसा या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यांसाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाच्या धतीवर तालुका स्तरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर शिबीरात तालुकास्तरावरील सर्व शासकीय विभागांच्या योजनांची माहिती तालुकास्तरावरील विभाग प्रमुखांकडून देण्यात येणार आहे. तसेच महिलांच्या विविध विभागांकडील समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यात येणार आहे. सदर शिबीरात गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जास्तीत-जास्त गरजू महिलांनी उपस्थीत राहावे व शिबीराचे लाभ घेऊन शिबीर यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालकल्याण विकास अधिकारी यांनी केले आहे.

चित्रपट माध्यम:तोडणारे की जोडणारे?

सध्या देशात "दि केरला स्टोरी" या चित्रपटावरुन मोठे वादळ सुरू आहे. काल्पनिक कथेला सत्य कथा आहे असे खोटे सांगून देशात धार्मिक व राजकीय धृर्वीकरण करण्याचा घाणेरडा प्रयत्न सुरू आहे. चित्रपट हे आपल्या कलेचे प्रदर्शन करुन लोकांचे मनोरंजन करण्यासाठी अतिशय चांगल्या प्रकारचे माध्यम आहे. भारतीय चित्रपट सृष्टीने अनेक चांगल्या प्रकारच्या कलाकृती देशाला दिलेल्या आहेत. त्या माध्यमातून देशाची मान निश्चितच जगात उंचावल्या गेलेली आहे. चित्रप्रसृष्टीतील अनेक कलाकारांनी सामाजिक क्षेत्रात सुद्धा चांगल्या प्रकारे आपले योगदान दिलेले आहे आणि समाजामधे जातीय-धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी भारतीय चित्रपट सृष्टी अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. परंतु मागील काही वर्षात आपल्या देशामधे धार्मिक उन्माद आणि द्वेष निर्माण करणारी एक मोठी यंत्रणा कार्यरत झालेली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून सर्व साधनांचा वापर करुन देशात जातीय धार्मिक तणाव निर्माण करण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात. त्यासाठी मीडियाचा सर्रास वापर केला जातो. अनेकदा धर्माचा वापर केला जातो आणि आता मागील काही वर्षांपासून चित्रपटाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात देशात धार्मिक वातावरण गढूळ करण्याचे काम नियोजनपूर्वक सुरू आहे. त्यासाठी चित्रपट सृष्टीतील काही लोकांचा वापर सुरू आहे.

सध्या "दि केरला स्टोरी" या चित्रपटाने देशात धुमाकूळ घातलेला आहे. दोन समाजामधे धार्मिक विद्वेष निर्माण करण्यासाठी या चित्रपटाचा जोरदार उपयोग सुरू आहे. तसेच तरुण मुला-मुलींच्या डोक्यात धर्मांधतेचे विष घालून त्यांना कट्टरतावादी बनवण्यासाठी या चित्रपटाचा उपयोग सुरू आहे. तीन मुलींच्या धर्मांतर आणि इसिसला जॉईन होण्याचा आकडा ३२ हजारावर नेऊन चित्रपट निर्मात्याने सपशेल खोटारडेपणा केलेला आहे. सुप्रीम कोर्टात हे प्रकरण गेल्यानंतर पोस्टरवर सत्यकथा आहे असे लिहिणारा निर्माता, दिग्दर्शक कोर्टात मात्र ही काल्पनिक कथा आहे असे सांगतो आणि ३२ हजार मुलींचा आकडा तीन वर आणतो. हा आकडा सुद्धा खरा असल्याचा पुरावा उपलब्ध नाही. मात्र चित्रपटातील ३२ हजार मुलींची स्टोरी देशात वनव्यासारखी पसरली आणि सर्वत्र चुकीचा संदेश जावून देशाचे फार मोठे नुकसान झाले. याचाच अर्थ चित्रपट निर्मात्याला दोन समाजामध्ये जाणूनबुजून संबंध खराब करायचे होते आणि त्याचा फायदा संबंधित राजकीय पक्षाला करुन द्यायचा होता हे स्पष्टपणे लक्षात येते. "वर्ल्ड पाप्युलेशन रिव्ह्यूच्या" जगभरातील आकड्यावरुन माहीत होते की, ज्या देशातून मोठ्या संख्येने लोक इसिसमधे सामील झाले आहे त्याम ध्ये इराक, अफगाणिस्तान, रशिया, जॉर्डन, सौदी अरब, तुर्की आणि फ्रांसचे युवक आहेत. सगळ्यात अधिक भरती मध्यपूर्वेच्या देशातून झाली आणि विशेष म्हणजे सामील झालेल्यात भारतीयांची संख्या अत्यंत कमी आहे. केरळ

निमगाव व नवेझरी ग्रा.पं.ची विभागस्तरीय समितीच्या वतीने तपासणी

✻ विभागस्तरीय चमुने केली विविध योजनांच्या कामाची पाहणी ✻ ग्रा. पं. पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद

गोंदिया:- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतंर्गत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची विभागस्तरीय तपासणी १९ मे रोजी अर्जुनी मोरगाव पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायत निमगाव व तिरोडा पंचायत समिती अंतर्गत नवेझरी येथे पार पडली. विभागस्तरीय चमुने दोन्ही गावात विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांकरीता राबविण्यात येत असलेल्या योजनांची पाहणी केली. यावेळी चमुने ग्राम पंचायत पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांशी संवाद साधला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतंर्गत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी राज्यात होत आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावात विविध योजनांद्वारे विकास कामे, नागरिकांना अनेक प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात आहेत. वैयक्तिक व सार्वजनिकस्तरीय उपाययोजना उभारुन गाव स्वच्छ व सुंदर करण्यावर भर दिला जात आहे. सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन्ही वर्षातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धा एकत्र घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर यांचे मार्गदर्शनात आठही पंचायत समितीस्तरावर? स्पर्धा पार पडल्या. जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान अर्जुनी मोरगाव तालुक्यातील निमगाव तर द्वितीय येण्याचा मान तिरोडा तालुक्यातील नवेझरी ग्रामपंचायतीने मिळविला होता. त्यामुळे या दोन्ही ग्रामपंचायती विभागीय स्पर्धासाठी पात्र ठरल्या होत्या. जिल्ह्यातील दोन्ही ग्राम पंचायतींची विभागस्तरीय तपासणी १९ मे रोजी पार पडली. विभागस्तरीय चमूमध्ये समितीचे अध्यक्ष म्हणून उपायुक्त (आस्था) विवेक इलमे, उपायुक्त (विकास) कमलकिशोर फुटाने, उपविभागीय अभियंता (मजिप्रा) अजय बेले, विस्तार अधिकारी श्री पटले आदींचा समावेश होता.

यावेळी चमुने सकाळी १०वाजता नवेझरी ग्रा. पं. कार्यालयात नागरिकांशी संवाद साधला. गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, ग्राम मंडळ अध्यक्ष महेंद्र भांडारकर, विस्तार अधिकारी नेताजी धारगावे, शितेश पटले, जिल्हा कक्षाचे भागचंद्र रहांगडाले, अतुल गजभिये, पंचायत समितीचे गट समन्वयक राठोड, समूह समन्वयक सुरेश पटले, तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील निमगाव येथे दुपारी ४ वाजता भेट देऊन तपासणी करण्यात आली.

यावेळी गटविकास अधिकारी विलास निमजे, विस्तार अधिकारी राणे, विस्तार अधिकारी मोरेश्वर धोंगडे, विस्तार अधिकारी ब्राह्मणकर, बंडगर, सरपंच बंदेश्वरी राऊत, उपसरपंच संदीप पुस्तोडे, माजी सरपंच विश्वनाथ बाळबुद्धे, ग्रामसेवक संतोष परमार, ग्राम पंचायत पदाधिकारी, बचतगट, विविध समित्यांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

नवेझरी येथे सचिव शेंडे व ग्राम मंडळ अध्यक्ष महेंद्र भांडारकर तर निमगाव येथील सचिव संतोष परमार यांच्याकडून तपासणी समितीला ग्राम पंचायत संबंधीत विविध योजना, घरकुल, मनरेगा अंतर्गत उपलब्ध रोजगार, ओडिएफ प्लस अंतर्गत निर्माण झालेल्या स्वच्छता सुविधांची माहिती देण्यात आली.

मुख्याध्यापक यांच्याकडून शाळा, विद्यार्थी गुणवत्ता, शाळेतील स्वच्छता सुविधा, पिण्याचे पाणी व्यवस्था, स्कॉलरशीप परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थी, नवोदय विद्यालयाकरीता निवड झालेले विद्यार्थीबाबत चर्चात्मक माहिती घेण्यात आली. अंगणवाडी सेविका यांच्याशी संवाद साधून विद्यार्थी संख्या, स्वच्छता सुविधा, बेबी टायलेट सुविधा, पिण्याचे पाणी, पोषण आहार बाबत माहिती जाणून घेण्यात आली. बचतगट महिलांशी गावस्तरावर महिलांना निर्माण झालेल्या उद्योग, खेळते भांगभांडवलाचा लाभ तसेच नळ पाणी पुरवठा योजना, पाणी शुध्दीकरण, जलसुरक्षक व महिलांच्या सहायाने पाणी गुणवत्ता राखणे, घनकचरा कचरा वर्गीकरण, सांडपाणी व्यवस्थापन, वॉटर मिटर, बॉयोगॅस व नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती घेऊन प्रत्यक्षात स्थळांना भेट देऊन पाहणी करण्यात आली.

मार्चमध्ये झालेल्या नुकसानीसाठी ४५७ शेतकरी पात्र



गोंदिया: जिल्ह्याला गत मार्च महिन्यात अवकाळी पावसाने झोडपून काढले. यामुळे शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले. नुकसानग्रस्तांना शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून २५.४० लखांची मदत मंजूर केली आहे. जिल्ह्यातील ४५७ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळणार आहे.

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे, याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरुपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीकरिता मदत देण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित दर व निकष १ नोव्हेंबर २०२२ पासून लागू केले आहेत. त्यानुसार मार्च २०२३ मध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती पिके नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील ४५७ शेतकऱ्यांसाठी २५.४० लाखचा निधी मंजूर केला आहे. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. यासंदर्भातील सुचनांची अंमलबजावणी करण्याची जवाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची राहणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर २४ मे रोजी

गोंदिया,:- तालुक्यातील महिलांना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने तसेच त्यांच्या स्थानिक विविध शासकीय विभागांशी संबंधीत समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन २४ मे २०२३ रोजी पंचायत समिती, गोंदियाचे सभागृहात सकाळी ०९ ते दुपारी १२ वाजता दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.

समस्याग्रत व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यांसाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाच्या धतीवर तालुका स्तरावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबीरात तालुका स्तरावरील सर्व शासकीय विभागाच्या योजनांची माहिती तालुका स्तरावरील विभाग प्रमुखांकडून देण्यात येणार आहे.

मूलभूत सोयीसुविधांच्या पूर्ततेसाठी सदैव प्रयत्नशील - सभापती संजय टेंभरे

फुलचुर येथे सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामाचे भूमिपूजन

गोंदिया: - फुलचुर मतदार संघातील क्षेत्रात अजूनही मूलभूत सोयी सुविधांची वानवा आहे. या भागातील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवत मला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली असल्याने या भागातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी, रस्ते, नाली, सांडपाण्याची व्यवस्था यासह मूलभूत सोयीसुविधांच्या पूर्ततेसाठी सदैव प्रयत्नशील राहणार, असे प्रतिपादन जिल्हा परिषद गोंदियाचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी केले.

फुलचुर येथे जिल्हा परिषदेच्या निधीतून १० लाख रुपयांच्या निधीतून जमीनदार वाडा समोरुन सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी प्रामुख्याने माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश चतुर, पंचायत समिती सदस्य स्नेहा गौतम, उपसरपंच सुरेंद्र सोनवणे, माजी ग्राम पंचायत सदस्य देवचंद बिसेन, होमेंद्र देवगडे, मुकेश नाईक, सीताराम बिसेन, सुनिल बोपचे, उर्मिला रहमतकर, गजेंद्र नाईक, संभुजी बिसेन, अमोल बिसेन, धर्मेंद्र देवगडे, शंकर बिसेन, सरस्वती नागपुरे, ग्रामपंचायत सदस्य सुकचंद येडे, संपत भाऊ बिसेन आदी उपस्थित होते. फुलचुर ग्रामपंचायत अंतर्गत आंबाटोली या भागात नवीन वसाहती निर्माण झाल्या आहेत. या भागात अजूनही हव्या तश्या सुविधा उपलब्ध नसल्याने नागरी सुविधा योजनांच्या माध्यमातून या भागातील समस्या ही लवकरच सोडविणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

होफ हॉस्पिटलच्या पुढाकाराने ककोडीत आरोग्य शिबिर

ककोडी:- होप हॉस्पिटल नागपूर व प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी यांच्या एकत्रित सहकार्याने आरोग्यवर्धिनी केंद्र ककोडी येथे निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दि. २० मे रोजी येथे घेण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदिनी रामटेकेकर यांच्या प्रयत्नाने आरोग्य सेवा हिच ईश्वर सेवा या भावनेने अतिदुर्गम गावातील गोरगरीब लोकांसाठी निशुल्क आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.होप हॉस्पिटल नागपूर येथील रुग्णालय व्यवस्थापक लोकेश अंबादे यांच्या सहकार्याने तेथील तज्ञ डॉक्टरांच्या टीमने जनसामान्य गोरगरीब लोकांची आरोग्य शिबिरात तपासणी केली.

आजच्या धकाधकीच्या व महागाईच्या काळात नवनवीन आजारांचा शिरकाव झाला असून त्या आजारावर मात करण्यासाठी लागणारी ऑपरेशन व औषधाचा खर्च सर्वसामान्य गोरगरीब माणसाला परवडत नसल्याचे चित्र दिसत आहे. लोकांमध्ये आधुनिक जीवनशैली अनुसरून वेगवेगळे आजार जसे हृदयाचे आजार, हाड व मणक्यांचे विकार, कर्करोग, पोट संबंधित विकार, मानसिक व्याधी ,मेंदू व नसांमधील आतडीचे विकार, छातीचे व्याधी, कान, नाक व तोंडाचे विकार अशा विविध आजाराने ग्रस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे अशा विविध आजारावर सदर आरोग्य शिबिरातून उपचार, तपासणी, शस्त्रक्रिया, औषधे व संदर्भ सेवा देण्यात येणार होते.

निशुल्क आरोग्य तपासणी शिबिरात १५० लोकांची नोंदणी करण्यात येऊन तपासणी व औषधोपचार करण्यात आला. शिबिरादरम्यान २५ लोकांची हृदयासंबधाने ईसीजी तपासणी करण्यात आली तर १२० लोकांची प्रयोगशाळा रक्त तपासणी करण्यात आली. ४२ लोकांना पुढील तपासणीसाठी नागपूर येथे संदर्भ सेवा देण्यात आली असून त्यांच्यावर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजनेतून शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदिनी रामटेकेकर यांनी दिली आहे.

तपासणी शिबिरात होप हॉस्पिटल नागपूर येथील तज्ञ पथकांमध्ये डॉ. सचिन गाठीबांधे, डॉ. सुरज गुप्ता, लोकेश अंबादे, श्रीकांत भालेराव, शशांक उपगाडे, सुरज राजपूत, सिमरन कोहट, रुपाली यांचा सहभाग होता तर प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी येथील वैद्यकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्टाफ नर्स, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका यांनी मोलाची कामगिरी केली.

महाराष्ट्रात केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर थांबवावा

गोंदिया:-जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या च्या वतीने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर हुकुमशाही पद्धतीने इडी कडून चौकशी केली असल्याच्या निषेधार्थ खासदार प्रफुल पटेल,माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांच्या नेतृत्वात गोंदिया जिल्हा राकापाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. ि

वरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून ईडी, सीबीआय, एनआयबी, अशा केंद्रीय यंत्रणेचा मोठ्या प्रमाणात गैरवापर करुन विरोधी पक्ष व लोकशाही कमजोर करण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून होत आहे यावेळी केंद्रीय यंत्रणांचा गैरवापराबद्दल निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, यशवंत गणवीर, अशोक सहारे, पुजा सेठ,केतन तुरकर, निरज उपवशी, माधुरी नासरे, विनित सहारे, अखिलेश सेठ, किरण पारधी, हरिराम आसवाणी, नागरतन बनसोड, नागो बनसोड, राज शुक्ला, हरबक्ष गुरणानी, नरहरप्रसाद मस्करे, सुनिल पटले, शैलेश वासनिक, रमेश कुरील, राजु येडे, रौनक ठाकूर, कपिल बावनथडे, कान्हा बघेले, मंगेश रंगारी, कुनाल बावनथडे, नरेंद्र बेलगे सहीत बहुसंख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंडिया बुक ऑफ रेकॉर्डला घ्यावी लागली नोंद

गोंदिया : गोरेगाव येथील मॉडेल कॉन्व्हेंट ॲण्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज येथे नर्सरीत शिक्षण घेत असलेला विद्याथी अनुदीप अंकुश चव्हाण (वय साडेतीन वर्षे) याने देशपातळीवर झालेल्या जनरल नॉलेज स्पर्धेत २०० प्रश्नांची उत्तरे तोंडपाठ दिल्याने त्याचे नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आले.अनुदीपने २०० प्रश्नांचे जनरल नॉलेजची उत्तरे दिले आहेत. त्याला देशपातळीवरील अनेक प्रश्न तोंडपाठ आहेत. अनेक गोष्टी लक्षात ठेवण्याच्या त्यांच्या क्षमतेची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने त्याला कौतुकाचे प्रमाणपत्र दिले आहे.

त्याचे आई वडील, संस्था संचालक आर. डी. कटरे, प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले, प्राचार्य सी. पी. मेश्राम, पर्यवेक्षक कु. एस. डी. चिचामे, वर्गशिक्षक आर. बी. पटले, लिपिक आर. बी. कांबळे यंच्यासह शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

जाती दावा पडताळणी संदर्भात आवश्यक सुचना

गोंदिया :- सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आरक्षित (अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) प्रवर्गातून १२ वी विज्ञान शाखा व व्यावसायिक शिक्षणाकरीता बी.ई., वैद्यकीय पदवी, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.एड., एल.एल.बी, एम.बी.ए. पदवी अभ्यासक्रमाला सीईटी व कॅप अंतर्गत प्रवेशाकरीता अर्ज सादर केले असेल अशा विद्यार्थ्यांनी जाती दावा पडताळणीचे प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे सादर केले असल्यास प्राप्त व सबळ पुरावे नुसार बहुतांश विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे. त्यांनी दिलेल्या ई-मेल आयडीवर जात वैधता प्रमाणपत्र नियमित पाठविण्यात येत असुन अर्जदारांनी त्यांचे ई-मेल आयडीवर तपासून प्राप्त करून घ्यावे.

ज्या अर्जदारांना अद्यापही जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही व ज्यांचे प्रकरणात त्रूटी आढळून आलेल्या आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकरणातील त्रुटी समिती कार्यालयाव्दारे त्यांचे ई-मेल आयडी व पत्राव्दारे कळविण्यात आलेल्या आहेत. तथापी, अद्यापही ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणी प्रकरणात त्रुटी पुर्तता केलेली नाही व ज्या विद्यार्थ्यांना अद्यापही जात वैधता प्रमाणपत्र ई-मेलव्दारे प्राप्त झालेले नाही, त्या विद्यार्थ्यांनी जाती दावा पडताळणी प्रकरणातील त्रुटी पुर्तता संदर्भात आवश्यक त्या मुळ व अतिरिक्त पुराव्यासह तात्काळ २२.०५.२०२३ ते २६.०५.२०२३ रोज सोमवार ते शुक्रवारला कार्यालयात उपस्थित राहावे.तसेच सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूका सन २०२२ पार पडल्या अशा विजयी झालेल्या उमेदवारांचे मागासवर्गीयांचे आरक्षित प्रवर्गातुन प्रस्ताव समिती कार्यालयात ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात सादर करण्यात आले होते. ज्या उमेदवारांचे प्रस्ताव वैध करण्यात आले त्यांचे ई-मेलवर जात वैधता प्रमाणपत्र पाठविण्यात आले असुन ते अर्जदारांनी प्राप्त करुन घ्यावे.

तसेच ज्या उमेदवारांचे प्रकरणात त्रुटी आढळून आलेल्या आहेत, अशा उमेदवारांना त्यांचे प्रकरणातील त्रुटी समिती कार्यालयाव्दारे त्यांचे ई-मेल आयडी व पत्राव्दारे कळविण्यात आलेल्या आहेत. अशा उमेदवारांनी जाती दावा पडताळणी प्रकरणातील त्रुटी पुर्तता संदर्भात आवश्यक त्या मुळ व अतिरिक्त पुराव्यासह तात्काळ २२.०५.२०२३ ते २६.०५.२०२३ या कालावधीत कार्यालयात उपस्थित राहावे.

अर्जदार या कालावधीत उपस्थित न झाल्यास व त्यांचे प्रकरणात त्रुटी पूर्तता न करु शकल्यास नियमानुसार त्यांचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात पडताळणी समिती राजेश पांडे यांनी केले आहे.

गोंदियात सभापतीपदी भाऊराव उके

गोंदिया: कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदियाच्या सभापती व उपसभापतपदाच्या निवडीसाठी १९ मे रोजी विशेष सभा घेण्यात आली. यात गोंदिया येथे सभापतीपदी परिवर्तन पॅनलचे भाऊराव उके व उपसभापतीपदी राजकुमार पटले यांची निवड करण्यात आली.

जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदाची निवडणूक २८ एप्रिल रोजी घेण्यात आली. यात गोंदिया बाजार समितीमध्ये आमदार विनोद अग्रवाल यांच्या चाबी संघटना व काँग्रसचे अशोक (गप्पु) गुप्ता यांचे परिवर्तन पॅनल निवडून आले. १८ संचालकांच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे १६ उमेदवार निवडून आले. त्यामुळे शुक्रवारी झालेल्या सभापती व उपसभापतीपदाची निवड येथे निर्विरोध झाली. सभापतीपदी चाबी संघटनेचे भाऊराव उके तर उपसभापतीपदी काँग्रेसचे राजकुमार (पप्पु) पटले यांची निवड झाली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे आमदार विनोद अग्रवाल, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक (गप्पु) गुप्ता, पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, धनंजय तुरकर, जितेश राणे यांच्यासह संचालक मंडळ व मित्र मंडळाने अभिनंदन केले.

ग्रा.पं.सदस्यांना मिळणार ३ वर्षांचा थकीत भत्ता

गोंदिया: ग्रामपंचायत सदस्यांचा बैठक भत्ता गेल्या तीन वर्षांपासून देण्यात आला नव्हता. सरपंच संघटनेतर्फे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे शासनाने ३.१६ कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषदेला वळता केला आहे. आठही तालुक्यातील सदस्यांना तीन वर्षांचा बैठक भत्ता मिळणार आहे.

ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांना बैठक भत्ता मिळतो. परंतु २०१९ नंतर मागील ३ वर्षाचा भत्ता सदस्यांना अदा करण्यात आला नाही. याबाबत मागणी सदस्यांकडून जिल्हा परिषद व शासन दरबारी वारंवार करण्यात येत होती. सरपंच परिषदेमार्फत वारंवार निधीसाठी पाठपुरावा करण्यात आला. मागणी लक्षात घेत राज्य प्रकल्प संचालक राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान पुणे यांच्या सुचनेनुसार जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्ता अदा करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे. याबाबद माहिती ग्रामपंचायत स्तरावरुन मागविण्यात आली व ३.१६ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाकडून जिल्ह्याला प्राप्त झाला. जिल्ह्यातील एकूण ५४६ ग्रामपंचायतींना २०१९-२० करीता ४५८६ सदस्यांना ५०२३३ उपस्थित दिवसांकरिता एकुण १.०४ कोटी, २०२०-२१ करीता ४५७१ सदस्यांना ५७४५२ उपस्थित दिवसांकरिता एकुण १.१४ कोटी तसेच २०२१-२२ करीता ४५८२ सदस्यांना ५०४८७ उपस्थित दिवसांकरिता एकुण १.०९ कोटी याप्रमाणे सदस्यांच्या एकुण १ लाख ५८ हजार १७२ उपस्थित दिवसांकरिता ३.१६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. जिल्हा परिषद गोंदियाला निधी प्राप्त झाला असून लवकरच तालुका स्तरावरुन सदस्यांना वाटप करण्यात येणार असल्याबाबतची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर यांनी दिली. तसेच प्रलंबित मागणी ऐकून घेत ग्रामीण क्षेत्रातील तळागळात कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांना सन्मान स्वरूपी देण्यात येणारा बैठक भत्ता मंजूर केल्याबद्दल सरपंच परिषदेचे जिल्हा अध्यक्ष जितेश गौतम यांनी राज्य शासनाचे व जिल्हा परिषदेचे आभार व्यक्त केले.

तिरोडा बाजार समितीच्या सभापती जितेंद्र रहांगडाले,उपसभापती भूमेश्वर रहांगडाले

तिरोडा:- सहकार क्षेत्रातील महत्वपूर्ण घटक म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती समजला जात असून आज दिनांक १९ मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती व उपसभापतीची निवडनुक संपन्न झाली. या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षातर्फे सभापतीपदासाठी जितेंद्र रहांगडाले तर उपसभापती पदासाठी भूमेश्वर रहांगडाले यांचे अर्ज दाखल करण्यात आले होते.

तर महाविकास आघाडीतर्फे सभापती पदासाठी ओम पटले तर उपसभापती पदासाठी दुर्गाप्रसाद कोठे यांचा अर्ज सादर करण्यात आलेला होता. यावर गुप्त मतदान घेण्यात यामध्ये सभापतीपदाकरिता जितेंद्र रहांगडाले यांना १८ पैकी १० मते व ओमप्रकाश पटले यांना ८ मते तसेच उपसभापती पदाकरिता भूमेश्वर रहांगडाले यांना १० मते तर दुर्गाप्रसाद कोठे यांना ८ मते पडली.

यामध्ये सभापतीपदी जितेंद्र रहांगडाले उपसभापतीपदी भूमेश्वर रहांगडाले यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या नेतृत्वात सलग दुसऱ्यांदा कृषी उत्पन्न बाजार समिती सत्ता स्थापन झालेली आहे.

परिनिरीक्षण मंडळ समितीत गोंदियाला डावलले

गोंदिया: महाराष्ट्र शासनाच्या रंगभुमी परिनिरीक्षण मंडळाच्या समितीत गोंदिया जिल्ह्यातील एकाही सदस्याची निवड न करता चंद्रपूर जिल्ह्यातील दोन सदस्यांची निवड करण्यात आली आहे. उल्लेखनीय म्हणजे यातील एक सदस्य गोंदिया जिल्ह्याच्या नावे दाखविण्यात आला आहे. दरम्यान ही निवड रद्द करुन गोंदियातील सदस्याल,ा समितीत स्थान द्यावे, अशी मागणी नाट्य कलावंत चेतन वळगाये यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या रंगभुमी परिनिरीक्षण मंडळाच्या समितीमध्ये प्रत्येक जिल्ह्यातील एक सदस्याची निवड करावयाची असते. त्या आधारावर गोंदिया जिल्ह्यातील एक सदस्य नियुक्त करायचा होता. परंतु तसे न करता चंद्रपूर जिल्ह्यातील दोन सदस्यांची निवड करण्यात आली आहे. यातील एका सदस्याला गोंदिया जिल्ह्याच्या नावे दाखविण्यात आले आहे. परंतु ते सदस्य प्रा. सदानंद बोरकर हे मुळे चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव येथील रहिवासी आहेत. आताही ते नवरगाव येथेच वास्तव्यास आहेत. गोंदिया जिल्ह्यातील नाहीत. गोंदिया हा झाडीपट्टीचा जिल्हा म्हणून ओळखला जात आहे. कित्येक वर्षापासून जिल्ह्यात अनेक नाट्यकलावंत, लेखक, संगीतकार, गीतकार, नाट्य व्यरस्थापक नट्य परीक्षक निर्माण झाले आहेत. आताही बरेच अष्टपैलू कलावंत रंगभुमीवर कार्यरत आहेत. झाडीपट्टी रंगभुमीची सांस्कृतीक कार्यक्रमाची सुरुवातच प्रथमतः गोंदिया जिल्ह्यातून होत असते. गोंदिया जिल्ह्यातील म्हसवानी येथील दंडार संपूर्ण महाराष्ट्रात नावारूपास आली आहे. झाडीपट्टीतील मराठी नाटकाची सुरुवात ही गोंदिया जिल्ह्यातून होते. अशा सांस्कृतीक वारसा जपणाऱ्या जिल्ह्याला वगळून रंगभुमी परिनिरीक्षण महामंडळाच्या समितीवर जिल्ह्यातील एका सदस्याची नेमणूक करायला पाहिजे होती. परंतु तसे न करता चंद्रपूर जिल्ह्यातील व्यक्तींना गोंदिया जिल्ह्यातील रहिवासी दाखवून रंगभुमीवर परिनिरीक्षण मंडळामध्ये सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. ही निवड नियमानुसार करण्यात आली नाही. त्यामुळे सदर सदस्याची निवड रद्द करुन गोंदिया जिल्ह्यातील सदस्याची निवड करण्यात यावी, अशी मागणी चेतन वळगाये यांनी केली आहे.

नवेगाव-नागझिरा पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनेल-वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात नव्या दोन वाघिणींचे आगमन, विदर्भ जगाचे टायगर कॅपिटल

गोंदिया :- संशोधन, पर्यटन, संवर्धन व ईन ब्रिडिंग या चार मुद्यांवर आधारित कार्य वनविभागाने हाती घेतले असून त्या अंतर्गत आज नवेगाव-नागझिरा अभयारण्यात वाघिणींचे स्थानांतरण करण्यात आले. नैसर्गिक अधिवासासाठी येथील जंगल उपयुक्त आहे. वाघिणींच्या आगमनामुळे नवेगाव-नागझिरा अभयारण्य वन्यजीव प्रेमी, अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनेल असा विश्वास वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प नैसर्गिक अधिवासासाठी उत्तम ठिकाण असून आज सोडण्यात आलेल्या वाघिणींच्या प्रजननातून वाघांची पुढील पिढी दर्जेदार निर्माण होण्यास सहाय्यभूत ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. ब्रम्हपुरी भूभागातून आणण्यात आलेल्या वाघीण नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत सोडण्यात आल्या.

या कार्यक्रमानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. खासदार सुनील मेंढे, अशोक नेते, आमदार विजय रहांगडाले, मनोहर चंद्रिकापुरे, पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र संदीप पाटील, गोंदिया निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यावेळी उपस्थित होते. विदर्भ हे जगाचे टायगर कॅपिटल झाले आहे असे श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले. भारत सरकारने पहिल्या टप्प्यात पाच वाघांचे स्थानांतरण करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार आज नवेगाव-नागझिरा प्रकल्पात वाघिणीचे स्थानांतरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी ११ वाघ असून वीस वाघ अधिवास क्षमता असल्याचे सांगून ते पुढे

म्हणाले की, वन्यजीव प्रेमी, अभ्यासक व पर्यटकांसाठी नवेगाव-नागझिरा आकर्षण केंद्र ठरणार आहे.

पुढील टप्प्यात तीन वाघांचे स्थानांतरण करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. नवेगाव नागझिरा प्रकल्पात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. स्थानिक ४०० युवकांना प्रशिक्षण तसेच शंभर वाघमित्र नेमले आहेत. वाघमित्रांना दोन हजार रुपये सन्माननिधी देण्यात येतो. तसेच पर्यटकांसाठी अत्याधुनिक सहा वाहने देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वाघांचे संवर्धन व स्थानांतर या उपक्रमा अंतर्गत एकूण ४-५ मादी वाघिणींना ब्रह्मपुरी भूभागातून नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात स्थानांतरीत करणे प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात २ मादी वाघिणींचे नागझिरा वन्यजीव अभयारण्य येथे आज स्थलांतर करण्यात आले आहे.

दोन्ही वाघिणींना नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या गाभा भागात सोडण्यात आले. वाघिणींना सोडल्यानंतर सॅटेलाईट जीपीएस कॉलर व व्हिएचएफ च्या सहाय्याने दोन्ही वाघिणींचे २४ ७ सक्रियपणे सनियंत्रण केले जाईल. संपूर्ण सनियंत्रणाचे कार्य हे कमांड आणि कंट्रोल रूम साकोली येथून नियंत्रीत केले जाणार आहे. या दोन स्थलांतरीत वाघिणींच्या निरीक्षणानंतर व उर्वरित घटक लक्षात घेऊन इतर मादा वाघांना टप्प्या-टप्प्याने स्थानांतरीत केले जाईल.

या उपक्रमामुळे नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात भविष्यात वाघाच्या संखेत वाढ होवून या प्रकल्पात पर्यटनाला चालना मिळू शकते. स्थानिकांना उपजिविकेच्या संधी निर्माण होतील तसेच जास्त व्याघ्र संख्या असलेल्या ब्रह्मपुरी भूभागातील मानवी वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा उपाय ठरू शकतो असे त्यांनी यावेळी सांगितले.

वनविभागाने कापली दल्लीच्या जंगलातून ५४ सागाची झाडे, होतेय चौकशीची मागणी

ग्रामस्थ करतायेत चौकशीची मागणी,आरएफओवर ग्रामस्थांचा रोष

गोंदिया:- स्वतःच्या शेतातील धुऱ्यावरचे सागाचे एक झाड तोडायचे असले तरी शेतकऱ्यांना वनविभागाचे उंबरठे झिजवावे लागतात. मात्र आपल्या हातून झालेली चूक लपवण्यासाठी जेव्हा खुद्द वन विभागच कामाला लागते तेव्हा कोण कुणाला काय म्हणणार असा प्रकार जिल्ह्यातील सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रधिकारी कार्यालयातंर्गत येत असलेल्या रेंगेपार दल्ली येथील जंगलपरिसरात घडले आहे. चांगल्या व सुस्थितीत असलेल्या सुमारे ५४ सागाची झाडे जानेवारी ते फेबुवारी महिन्यात कापण्यात आली असून या झाडापासून कुठलाही धोका नव्हता असे ग्रामस्थ सांगत आहेत. २०२० मध्ये जी झाडे वादळी वाऱ्यामुळे कोलमडली होती, ती आधीच वनविभागाने नेलेली होती,मात्र आता जी झाडे आत्ता कापली ती एकदम चांगली होती असेही ग्रामस्थांचे म्हणने आहे.

प्रत्यक्ष त्या जंगलातील कापलेल्या झांडाची पाहणी केल्यावरही त्या साग झाड्याच्या बुंध्यापासून लक्षात येते की सदर झाड किती चांगले राहिले असेल

परंतु वनविभागाचे अधिकारी वादळ वाऱ्यामुळे झाडे पडण्याचा धोका होता, तर काही झाडे वाळायला लागली होती असे विविध कारणे आणि दर २० वर्षांनी झाडे कापावी लागतात असे कारण पुढे करुन ५४ साग झाडे कापल्याचे प्रकरणाला शासकीय लवाजमा घालण्यात यशस्वी झाल्याचे दिसून आले. मात्र ग्रामस्थ आणि काही नागरिकांच्या मते ही कापलेली झाडे अवैधरित्या कापली गेल्याचे म्हणने आहे.

विशेष म्हणजे सदर झाडांना फ`बुवारी महिन्यात कापण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणाचा तपास मिळालेल्या माहितीनुसार वनविभागाचे फिरते पथक करीत असल्याची माहितीही आहे. कुणी स्वतःहून झाड तोडलेच तर वन अधिनियमानुसार तो गुन्हा ठरतो. त्यातच सर्वोच्च न्यायालय आणि वनविभागाच्या कायद्यानुसार आता जंगलातील झाडे तोडण्यावर बंदी आहे. ती झाडे त्याचठिकाणी पडून कुजतील परंतु त्यांना कापायचे नाही, आणि उचलायचे नाही असे असतांना व नवेगाव नागझिरा अभयारण्याच्या क्षेत्रात हा भाग येत असल्याने झाड कापण्याचा प्रश्नच उदभवत नसल्याचे अनेकांचे मत आहे.

यासंदर्भात सडक अर्जुनी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्राधिकारी सुरेश जाधव यांना विचारणा केल्यावर माझ्याकडे वेळ नाही, मी वेगळ्या कामात आहे माहीत देऊ शकत नाही असे सांगत सदर प्रकरणात माहिती देण्यास टाळाटाळ केली. तर दुसरीकडे गोंदिया उपवनसरंक्षक कार्यालयातील सहाय्यक वनसंरक्षकांना याबाबत विचारणा केल्यावर आपण सदर जागेची पाहणी केल्याशिवाय काहीही सांगू शकणार नसल्याचे बेरार टाईम्सला सांगितले.

२३ वर्षांपासून मुरदोली प्रवेशद्वार कुलूपबंद

गोंदिया:- नवेगावबांध नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे मुरदोली प्रवेशद्वार गोंदिया कोहमारा मार्गावर मुरदोली गावाजवळ आहे. त्यामुळे या प्रवेशद्वारावर पर्यटकांची वर्दळ वाढली होती. मात्र गोंदिया-कोहमारा या मार्गावरील मुरदोली प्रवेशद्वार रेल्वेच्या अडथळ्यामुळे गेल्या २३ वर्षांपुर्वी बंद करण्यात आले. प्रवेशद्वार सुरु करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत असून देखील त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. परिणामी प्रवाशांना दुरचे अंतर कापून व्याघ्र प्रकल्पात जावे लागत आहे.

गोंदिया जिल्ह्यात असलेले नागझिरा व्याघ्रप्रकल्प म्हणजे वन्यप्रेमींकरिता पर्वणीच आहे. या जंगलात येणाऱ्या पर्यटकांना वन्यप्राणी हमखास दर्शन देतात. हे प्रकल्प आधी अभयारण्य म्हणून प्रसिद्ध होते. मात्र गेल्या काही वर्षांपुर्वी या प्रकल्पाला व्याघ्र प्रकल्प असे नामकरण करण्यात आले.

या प्रकल्पात वन्यप्राणी नैसर्गिकरित्या विचवण करताना आढळून येत असल्यामुळे या प्रकल्पात येणाऱ्या वन्यप्रेमींची संख्या गेल्या काही वर्षात वाढली आहे. जिल्हा, राज्य नव्हे तर संपूर्ण देश आणि विदेशातील पर्यटक देखील या प्रकल्पाला हमखास भेट देवून येथील प्राणी, पक्षी आणि जंगलातील वनस्पती आणि झाडांचे देखील निरीक्षण करतात. या अभयारण्यात येण्याकरिता वन विभागाने आधी पीटेझरी, मंगेझरी, चोटखमारा आणि मुरदोली हे प्रवेशद्वार सुरु केले होते. मात्र गोंदिया-कोहमारा या मार्गावरील मुरदोली प्रवेशद्वार गेल्या २५ वर्षांपुर्वी बंद करण्यात आले. मुरदोली नागझिरा अभयारण्य प्रवेश द्वार गोंदिया कोहमारा मार्गावर मुरदोली गावाजवळ आहे. त्यामुळे या प्रवेशद्वारावर पर्यटकांची वर्दळ वाढली होती. वन विभाग आणि मुरदोली ग्रामपंचायतीला या प्रवेशद्वारापासून महसूल मिळत होता. परंतु हे प्रवेशद्वार बंद केल्यामुळे प्रवेशद्वार इमारत, रस्ता, झाडे, वन्यप्राण्यासाठी पाणवठे, नवीन झाडांची लागवड याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांचा रोजगार देखील हिरावला असल्याची ओरड सुरु झाली. या संदर्भात वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार मुरदोली, नागझिरा अभयारण्य प्रवेश द्वारापासून मुख्य नागझिरा संकुलांचे अंतर १५ ते २० किलोमीटर आहे. या मार्गावर गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्ग आहे. रेल्वे विभागाने या रस्त्यावर सुरक्षा चौकी लावली नव्हती. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षा कारणास्तव हा मुरदोली प्रवेशद्वार बंद करण्यात आला असल्याची माहिती आहे. वनविभागाने याकरिता अनेकदा रेल्वे प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला. परंतु रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षीत धोरणामुळे पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले आहे.

रेल्वे म्हणतो कर्मचाऱ्यांचा अभाव

नागझिरा प्रकल्पातून गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्ग जातो. या मार्गामुळे पर्यटकानच्या जीवाला धोका असल्यामुळे मुरदोली येथील प्रवेशद्वार बंद करण्यात आल्याचे वनविभागाचे म्हणने आहे. त्यासंदर्भात रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी बातचित केली असता रेल्वे प्रशासनाकडे कर्मचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे रेल्वे फाटकांवर कर्मचारी राहत नाही. रेल्वे फाटकाऐवजी भुयारी पूल तयार करा. अशी मागणी आल्यास ते बांधून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

२९ हजार ५९३ शेतकरी पंतप्रधान किसान सम्मान निधीपासून मुकणार

गोंदिया: केंद्र सरकारच्या पंतप्रधान किसान सम्मान निधीसाठी जिल्ह्यातील २१ हजार ५९३ शेतकऱ्यांनी अजूनही आपले बँक खाते आधार संलग्न आणि केवायसी प्रामाणीकरण केले नाही. त्यामुळे येत्या काही दिवसांत वितरीत होणाऱ्या ६ हजार रुपयांच्या १४ व्या हप्त्यापासून वंचित राहण्याची भिती निर्माण झाली आहे.

केंद्र सरकारकडून पीएम किसान सम्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये दिले जातात. काही दिवसांपुर्वीच सरकारने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १३ वा हप्ता जमा केला. २०२३ पासून ज्या शेतकऱ्यांची केवायसी झाली आहे. त्यांनाच पुढील हप्त्याची रक्कम दिली जाईल, असा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला. यापुर्वी या योजनेचा लाभ ५ एकरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना दिला जायचा. मात्र, आता ही मर्यादा हटविण्यात आली. फक्त भारतातील रहिवाशांनाच या योजनेचा लाभ मिळेल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना बँक खाते उघडावे लागेल. अल्पभूधारक शेतकरी कुटूंब म्हणजे पती-पत्नी आणि अल्पवयीन मुलांना या योजनेचा लाभ देण्याचे सरकारने जाहीर केले. एका कुटुंबाकडे एकूण २ हेक्टरपेक्षा कमी जमीन असेल तरच या योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळेल. राज्य सरकारने नमो शेतकरी सम्मान महानिधी योजना जाहीर केली. या योजनेच्या अटीही केंद्र सरकार प्रमाणेच असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या जात आहेत.

१३ वा हप्त्याचे ७८ हजार लाभार्थी

६ हजार रुपये शेतकऱ्यांना तीन टप्प्यात दिले जाते. प्रत्येक टप्प्यात २ हजार रुपये दिले जातील. म्हणजे शेतकऱ्याला सरकारकडून दरमहा ५०० रुपये मिळतील. सर्व निकषांची पूर्तता केल्याने जिल्ह्यातील ७८ हजार शेतकऱ्यांना पीएम किसान सम्मान निधी योजनेच्या १३ व्या हप्त्याचा लाभ मिळाला आहे.

पीएम किसानच्या अटी नमो निधीसाठी

केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारही नमो शेतकरी महासम्मान निधी योजनेंतर्गत दरवर्षी ६ हजार रुपये देण्याची घोषणा केली. १४ व्या हप्त्यासाठी केंद्राने लावलेल्या लाभार्थी अटी राज्य सरकारनेही मान्य केल्या. पुढील महिन्यात दोन्ही योजनांचे प्रत्येकी ६ हजार असे एकूण १२ हजार रुपये एकत्रित देणार असल्याची प्रशासनात चर्चा आहे. मात्र नव्या अटींमुळे शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागणार आहेत.

असे आहेर अटींचे अडथडे

केंद्र सरकारने १३ वा हप्ता दिला. पण आता १४ व्या हप्त्याचा लाभ घेण्यासाठी आता अटींचे अडथडे निर्माण केले. शेतकऱ्यांना आता भूमी अभिलेख नोंदी पोर्टलवर अपडेट २ कराव्या लागणार आहेत. त्यासाठी त्यांना तालुकास्थळी जावे लागेल.तहसीलदार हे पीएम किसान योजनेचे समन्वयक अधिकारी आहेत. त्यांच्याकडून नोंदी अपडेट कराव्या लागतील. त्याशिवाय बँक खाते आधार क्रमांकास जोडावे लागेल. त्या खात्याची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे.

ओबीसी जनगणनेकरीता निघणार विदर्भात मंडल यात्रा

गोरेगाव:- येत्या संविधानदिनी ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना करण्यात यावे यासह ओबीसींना कलम ३४० नुसार सर्व अधिकार देण्यात यावे या मागणीला घेऊन राज्यव्यापी विराट मोर्च्याचे आयोजन नागपूरच्या विधानभवनावर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्या विराटमोर्च्याच्या नियोजनासह ३० जुर्लेपासून दोन टप्यात सुरु होणार्या मंडल यात्रेबद्दल गोरेगाव येथील एमसीपी विद्यालयाच्या सभागृहात झालेल्या गोंदिया जिल्ह्यातील ओबीसी कार्यकर्ता बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीला ओबीसी फेडरेशनचे अध्यक्ष बळीराज धोटे, स्टुडटंस राईटस असो.चे अध्यक्ष उमेश कोराम, ओबीसी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे, अशोक लंजे, ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीला जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील ओबीसी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत ओबीसी आंदोलनाला व्यापक रुप देत ओबीसी जनगणनेकरीता

केंद्रसरकारवर दबावगट निर्माण करणे.७ ऑगष्ट मंडल आयोग दिन म्हणजे ओबीसी अधिकार दिन म्हणुन साजरा करणे.

महाज्योती संस्थेमार्फत राबवण्यात येत असलेल्या ओबीसी,एस.बी.सी,विजे,एनटी, विद्यार्थीच्या योजंना विद्यार्थ्यापर्यंत पोचवणे आणि ओबीसी हिताकरीता निघणाऱ्या मंडल यात्रेला यशस्वी करण्यासोबतच चंद्रपूर येथील समारोप कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ओबीसींना उपस्थित राहण्याचे आवाहन उमेश कोराम यांनी केले. ओबीसींच्या सांविधानिक अधिकाराकरीता २६ नोव्हेंबर २०२३ संविधान दिवसाला भव्य विराट मोर्च्यात सर्व महीला, विद्यार्थी, शेतकरीबांधवाना सहभागी करुन घेण्याकरीता गावागावापर्यंत हा संदेश पोचविण्याचे आवाहन बळीराज धोटे यांनी केले. बबलु कटरे यांनी ओबीसी शेतक-यांची पिढवणुक सरकार कशा पध्दतीने करते यावर सविस्तर माहीती दिली.

ओबीसी वर्ग धर्म व मुस्लिम विरोधात जास्त विचार करतो पण स्वतःच्या अधिकारांसाठी एकत्रित येत नाही. ही शोकांतिका आमच्या ओबीसीची असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. बैठकीचे प्रास्तविक ओबीसी सेवा संघाचे राज्यउपाध्यक्ष सावन कटरे यांनी केले. तर संचालन तालुका महासचिव भुमेश ठाकरे यांनी केले.आभार जिल्हा मार्गदर्शक विनायक येडेवार यांनी मानले.

सभापती बंजार यांच्या शुभहस्ते विविध ठिकाणी भूमिपूजन

देवरी - स्थानिक पंचायत समिती अंतर्गत पंधरयुक्त कामाचे भूमिपूजन आदिवासी विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा अंभोरा आदिवासी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष भरतसिंग दुधनाग यांच्या अध्यक्षतेखाली सभापती अंबिका बंजार यांच्या शुभहस्ते विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

यात तालुक्यातील कोसबी खुर्द येथे बोअ`करुन पंप लावणे, अंभोरा येथील जि. प. शाळा तथा अंगणवाडी येथे बोअ`करणे, इमारत दुरुस्ती आणि शौचालय बांधकाम तर, पिंडकेपार येथील अंगणवाडी क्रमांक - १ ची इमारत दुरुस्ती करुन डिजीटल करणे.भूमिपूजन प्रसंगी सरपंच यमुना शृंगकार, पोलिस पाटील दिनदयाल दुधकवरा, प्रल्हाद दुधनाग, शिवकुमार राऊत, सचिव मधुकर शहारे उपस्थित होते.

सभासद हित केंद्रस्थानी ठेवून अल्प व्याजदरात कर्ज पुरवठा

गोंदिया: जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादितची निवडणुकीनंतर नोव्हेंबर २०२२ पासून संस्थेमध्ये नवीन व्यवस्थापक समिती अस्तित्वात आली. या व्यवस्थापक समितीने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासनांची पूर्तता पहिल्याच विशेष आमसभेत पूर्ण केली. अतिशय महत्वपूर्ण अशी घोषणा कर्जावरील व्याजदर राष्ट्रीयकृत बँकेच्या गृहकर्जापेक्षा कमी व्याजदर करणे हे होते आणि त्याची पूर्तता करुन व्याजदर ८.७५ करण्यात आल्याची माहिती संस्था कार्यकारी प्रमुख सचिव कमलेश बिसेन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सचिव कमलेश बिसेन यांनी संस्था सभासद यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांना सर्वात कमी व्याज दरामध्ये एका फॉर्मवर रुपये वीस लक्ष कर्ज दिले जात आहे. यापुर्वी ११ टक्के निवडणूक पुर्वी १० टक्क्याने कर्ज मिळत असले तरी सभासद कर्ज उचल करीत नव्हते. त्यामुळे संस्थाकडे निधी पडून राहत होता. त्याचा नुकसान संस्भेला व सभासद यांचे होत होते. मात्र आता माहे नोव्हेंबर २०२२ पासून मार्च २०२३ पर्यंत एकुण ९ कोटी कर्ज वाटप करण्यात आला आहे. तर २२-२३ या आर्थिक वर्षात माहे मार्च ते एप्रिलपर्यंत १८ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आला. एकुण या कालावधीत २७ कोटी रुपये कर्ज वाटप झाला असून पुन्हा ५ कोटी रुपये कर्जाचे अर्ज प्रलंबित आहेत. संस्थेची वाटचाल योग्य दिशेने सुरु असून संस्थेमधून ८.७५ गृहकर्जाप्रमाणे सभासदांना कर्ज वाटप करण्याचे निर्धारित केले आहे. त्यानुसार सभासदांची कर्जाची मागणी सुद्धा वाढली आहे.

आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांच्या समस्या लागणार मार्गी

आमदार सुधाकर अडबाले : आदिवासी विकास विभागात समस्या निवारणार्थ सहविचार सभा

गडचिरोली : आदिवासी विकास विभागातील कार्यरत अनुदानित व शासकीय आश्रम शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ सहविचार सभा आमदार सुधाकर अडबाले यांच्या उपस्थितीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर येथे नुकतीच पार पडली. आदिवासी विभागातील सर्व समस्या व प्रलंबित प्रकरणे ३० जूनपर्यंत निकाली काढण्यात यावी, असे निर्देश सभेतील चर्चेदरम्यान आमदार सुधाकर अडबाले यांनी दिले.

प्रस्तावित नविन शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मधे लागू होणारा वेळापत्रक रद्द करणे, समायोजन झाल्याशिवाय पदभरतीस परवानगी देण्यात येवू नये, समायोजन करताना प्रवर्गाची अट शिथिल करणे, सर्व कर्मचाऱ्यांची १ जुलै २०२४ ची वेतनवाढ नियमित करावी, GPF/DCPS कर्मचाऱ्यांच्या पावत्या, अनुदानित आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयातील (विज्ञान शाखा) येथिल कार्यरत पदावर पदोन्नती, रात्रकालीन चौकीदार यांना वेतनश्रेणी लागू करणे, १०, २०, ३०, आश्वासित प्रगती योजना शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करणे, शासकीय आश्रम शाळेच्या प्रयोगशाळा कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रशिक्षण देणे, शिक्षक-शिक्षकेत्तर (DCPS) कर्मचाऱ्यांचे प्राणकार्ड मिळणे, कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तिका अद्ययावत करून दुय्यम प्रत मिळणे, भानिनि परतावा/नापरतावा मिळण्यासाठी होणारी दिरंगाई दूर करणे, अनुदानित आश्रमशाळा भिसी प्रकल्प चिमूर

येथील सर्व कर्मचाऱ्यांचे समस्या निकाली काढणे, अनुदानित आश्रम शाळा पावीमुरांडा प्रकल्प गडचिरोली येथील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे तात्पुरते समायोजन शासकीय आश्रमशाळेत कायम करणे, प्रतिक्षेचा पूर्ण कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करून प्रतीक्षा कालावधीने वेतन मिळणे, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्तीवेतन व रुग्णता सेवा निवृत्ती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन मंजुरीबाबत प्रस्ताव बोलविण्याबाबत, आदिवासी आश्रमशाळा ६ जूनऐवजी २६ जूनपासून सुरू करणे व इतर अनेक समस्या व वैयक्तिक प्रलंबित असलेल्या समस्यांवर सभेत चर्चा करण्यात आली. या सर्व समस्या व प्रलंबित प्रकरणे ३० जूनपर्यंत निकाली काढण्यात यावे, असे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी दिले. सोबतच अपर आयुक्त रवींद्र ठाकरे यांनी सुद्धा सर्व प्रकरणे सोडविण्यासाठी सकारात्मक चर्चा केली व प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणार असल्याचे आश्वस्त केले. सभेत सर्व नऊ विभागातील प्रकल्प अधिकारी काही प्रत्यक्ष तर काही ऑनलाईन जुडले होते. ही सभा चार तास चालली.

या सभेला प्रा. बी.टी. भामरे, जगदीश जुनघरी, उपायुक्त कुळमेथे, जोशी, विदर्भ माध्यमिक शिक्षण संघ नागपूरचे शहर अध्यक्ष विठ्ठल जुनघरी, गडचिरोली कार्यवाह अजय लोंढे, संघटनेचे पदाधिकारी भोजराज फुंडे, आर. टी. खवशी, नितीन माकोडे व मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

मुरकुटडोह येथे पोहोचणारे पहिले मंत्री ठरले मुनगंटीवार

गोंदिया:- राज्याच्या अतिपूर्वेकडे असलेला जिल्हा. जिल्ह्याची सीमा ही मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याला लागून आहे. या दोन्ही राज्याच्या सीमा आणि गडचिरोली जिल्ह्याचा सीमा भाग हा जंगलव्याप्त, अतिदुर्गम, आदिवासी बहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील असल्यामुळे गोंदिया जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जातो. त्यातच देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम, आदिवासी बहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील असलेल्या मुरकुटडोह, दंडारी, दलदलकुही आणि धनेगाव येथे राज्याचे वनमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार पोचणारे मंत्री ठरले आहेत. त्यांनी येथे नक्षलचळवळीवर आळा घालण्याकरीता तयार करण्यात आलेल्या आऊटपोस्टच्या लोकार्पणानंतर ग्रामस्थांशी संवाद साधून विविध विषयांवर चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

जिल्हा निर्मितीनंतर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पहिल्यांदा सडक मार्ग तयार झाल्याने त्याठिकाणी जिल्हयातील आरोग्य यंत्रणेसह अन्य यंत्रणा कशाप्रकारे दक्ष राहून काम करीत आहे हे बघण्यासाठी पहिल्यांदा पोचणार्या जिल्हाधिकारी डॉ.कादंबरी बलकवडे या ठरल्या. विशेष म्हणजे जुर्ले २०२० रोजी मटाने पहिल्यांदा ही गावे मुख्य मार्गाने जोडली गेल्याच्या वृत्तासोबतच काही समस्याही जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्या होत्या.

प्रशासनाच्या वतीने जिल्हयातील अतिदुर्गम, आदिवासी बहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील भागात शेवटच्या घटकापर्यंत आरोग्याच्या व शिक्षणाच्या सुविधा, सार्वजनिक वितरण व्यवस्था, प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, घरकुल योजना, शालेय पोषण आहार आणि अन्य केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना आणि नागरिकांना मिळत आहे किंवा नाही याबाबत पालकमंत्री मुनगंटीवार, नक्षल पोलीस उपमहासंचालक संदिप पाटील,खासदार अशोक, सहा.जिल्हाधिकारी अनमोल सागर, पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक अशोक बनकर यांनी मुरकूटडोह व दंडारी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली.